



# पार्श्वभूमी


## पाहिजेत
नामांकित मोबाईल होलसेलमध्ये काम करणारे मुले पाहिजेत
सेल्समन - 2 जागा
डिलेव्हरी बॉय - 2 जागा
इच्छुकांनी खालील नंबर वर संपर्क साधावा
फोन नंबर - 9225141440


बीड वर्ष ३६ वे अंक १०८ वा फोन २३०१०१ दिनांक १८ मार्च २०२६ बुधवार — गंमत भंडारी — ई-पेपर : www.parshvbhumi.com — Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 — पाने ६ किंमत ४रु.

# घृणास्पद आणि संतापजनक; पेठ बीडमध्ये फैजान नामक नराधमाकडून ६ वर्षाच्या बालिकेवर अत्याचार

**बीड दि.१७ (प्रतिनिधी):– घराच्या समोरच राहणाऱ्या फैजान अलीम शेख या नराधमाने खाऊ देतो असे सांगून ६ वर्षाच्या लहान मुलीला उचलून त्याच्या घराच्या वरच्या मजल्यावर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याची फिर्याद मुलीच्या आईने पेठ बीड पोलीस ठाण्यात दिली असून आरोपी फैजान विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७४,७६ तसेच बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना घडल्यानंतर संताप व्यक्त होत असून आरोपीला तात्काळ अटक करावी. एका ६ वर्षाच्या मुलीवर दुपारी ५ वाजता अशी घटना घडत असेल तर असल्या नराधमांपासून लहान बालकही सुरक्षीत नाहीत अशा संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.**



येथील पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घराच्या समोर मैत्रिणीसोबत खेळत असलेल्या एका मुलीला तिच्याच घरासमोर रहात असलेल्या फैजान अलीम शेख याने अत्याचार केला. दि.१६ मार्च रोजी दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास मुलगी ही मोठमोठ्याने रडत होती. तिच्या रडण्याचा आवाज ऐकून मुलीची आई घराच्या बाहेर आली. मुलगी खूप घाबरलेली होती, जोरजोरात रडत होती. आईने मुलीला घरात नेले व तिला विचारणा केली असता तिने सांगितले की, तिची मैत्रिण व ती घराच्या समोर खेळत असतांना समोर राहणारा फैजान आला व त्याने मुलीच्या मैत्रिणीला घरी जाण्यास सांगितले, ती घरी निघून गेली. व एकट्या मुलीला पाहून त्याने तिला चिकू व खाऊ देतो, माझ्यासोबत घरामध्ये वर चल असे म्हणून तिला उचलून घेतले व घराच्या वरच्या मजल्यावर घेऊन गेला व तिच्यावर अत्याचार केला. सदर मुलीने हा खळबळजनक प्रकार सांगितल्यानंतर मुलीच्या आईने मुलीच्या वडिलास फोन करुन घडलेल्या घटनेची माहिती दिली. यानुसार आरोपी फैजान अलीम शेख याच्या विरुद्ध पेठ बीड पोलीस ठाण्यात मुलीच्या आईच्या तक्रारीवरुन भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ७४,७६ तसेच बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पान २ वर

## चहा देण्याचे निमीत्त करुन कॉप्यांचा पुरवठा

### तांबा राजुरी शाळेतील प्रकार

बीड दि.१७ (प्रतिनिधी):- परीक्षा केंद्रात असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना चहा देण्याचे निमीत्त करुन चहाची केटली घेऊन आत जात असतांना आत जाणाऱ्या व्यक्तींकडून परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांना कॉप्या दिल्या जात असल्याचा प्रकार माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी येथे होत असून या विरुद्ध तात्काळ कारवाई करावी व कॉपी पुरवठा करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी होत आहे.
पाटोदा तालुक्यातील माध्यमिक विद्यालय तांबाराजुरी येथे दि.१६ मार्च रोजी सोमवारी सामाजिक शास्त्र विषयाचा पेपर होता, या पेपरला मोठ्या प्रमाणात कॉप्या झाल्या. पेपर सुरु झाला की विद्यार्थ्यांना त्यांचे पालक चक्क वर्गात जाऊन अपेक्षित व इतर कॉपीचे मटेरियल देतात, काही जण चहाचे निमीत्त करुन आत पान २ वर

## मासेमारी करणारे कापूस, वीज पंपाचे वायर चोरतात, मोराची हत्या करतात

### कवडगाव ग्रामस्थांची मासेमारी आदेश रद्द करण्याची मागणी

बीड दि.१७ (प्रतिनिधी):- मासेमारीसाठी ज्यांना ठेका दिलेला आहे असे लोक मासेमारी करण्या सोबतच तलावाच्या बाजुस असलेल्या शेतकऱ्यांचा कापूस चोरत आहेत, तसेच सौरपंपाचे वायर चोरुन नेत आहेत व तलावाच्या बाजुच्या असणाऱ्या झाडावरच्या मोरांची शिकार करत आहेत. त्यामुळे कवडगाव पिंपळा ता.गेवराई पाझर तलावामधील मासे पकडण्यासाठी दिलेला आदेश रद्द करावा अशी मागणी कवडगाव येथील ग्रामस्थांनी जिल्हा संधारण अधिकारी लघु पाटबंधारे जिल्हा परिषद बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
या संदर्भात ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा संधारण अधिकाऱ्यांनी पाझर तलाव क्रमांक ३ कवडगाव पिंपळा या तलावामध्ये मासे धरण्याचा आदेश पारीत केला आहे, ज्यांना हे आदेश दिलेले आहेत ते लोक मासेमारी करीत असतांनाच तलावाच्या बाजुस असलेल्या शेतकऱ्यांचा कापूस चोरुन नेतात तसेच सौरपंपाचे वायर चोरुन नेलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तसेच तलावाच्या बाजुला झाडी असून या झाडीवर मोरांचे वास्तव्य आहे. सदर मासेमारी करणारे लोक मोरांची शिकार करतात त्यांची हत्या करतात. मोठ्या प्रमाणात मोर मारले गेले आहेत. मोरांची हत्या करणे हा गुन्हा आहे. मोर हा राष्ट्रीय पक्षी असल्यामुळे त्याची हत्या करता येणार नाही, त्यामुळे मासेमारी करणाऱ्यांना दिलेला आदेश रद्द करण्यात यावा तसेच मोरांना संरक्षण देण्यात यावे, ज्या संस्थेला मासेमारीचा ठेका दिलेला आहे या संस्थेचा मंजुरीचा पान २ वर

## आ.सुरेश धस यांची बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार विभागातील महाघोटाळ्यावर सभागृहात लक्षवेधी

**पाटोदा दि.१७ (प्रतिनिधी):– आष्टी– पाटोदा– शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी मंगळवार दि.१७ मार्च रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी क्रमांक सात मांडत बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार विभागातील महाघोटाळा सभागृहाच्या पटलावर आणला. अत्यंत सविस्तर आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडणी करत त्यांनी मृत व्यक्तींनाच जिवंत दाखवून कामावर हजर केल्याचे आणि त्यानंतर पुन्हा मृत्यू दाखवत लाखो रुपयांचे अनुदान लाटल्याचे गंभीर आरोप केले.**




### मृत कामगार झाले जिवंत आणि बीड जिल्ह्यातील कामगार दुबईच्या बुर्ज खलिफा व अमेरिकेतील व्हाईट हाऊसवर दाखवले

आमदार धस यांनी सांगितले की जुलै २०२० ते २०२६ या कालावधीत ११५ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी केवळ ५३ प्रकरणांमध्ये कागदपत्रे सादर झाल्याचे मंत्री महोदयांनी नमूद केले. मात्र प्रत्यक्षात कोरोनाच्या काळात आणि त्याआधी मृत्यू पावलेल्या व्यक्तींनाच पुन्हा जिवंत दाखवून १०० दिवस कामावर दाखवण्यात आले आणि त्यानंतर त्याच व्यक्तींचा मृत्यू दाखवत त्यांच्या वारसांना २ लाख ३० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
या घोटाळ्याचे उदाहरण देताना आमदार धस यांनी सांगितले की निळकँठ शामराव वडमारे यांनी १४ जुलै २०२५ रोजी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत कमलाकर रंगनाथ मुडेगावकर या व्यक्तीचा उल्लेख आहे. त्यांच्या घरातील फोटोवर मृत्यू पान २ वर

## मोगऱ्याच्या गोदावरी नदीतून दिवसाढवळ्या वाळूची चोरी

माजलगाव दि.१७ (प्रतिनिधी):- तालुक्यातील मोगरा गाव परिसरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीपात्रात दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू असून, यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दिंद्रुड पोलिस ठाणे व महसूल प्रशासन या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे तर गोदावरी नदीपात्रातुन वाळु काढण्यासाठी परराज्यातील २० ते २५ तरूण कामगार कार्यरत आहे. दरम्यान या अवैध वाळु वाहतुकीने रस्त्याचे तिनतेरा वाजले असुन शेतकरी, ग्रामस्थ हैराण झाले आहेत. गोदापात्रात पाणी असले तरी केनी, चप्पुच्या सहाय्याने पाण्यात एक ब्रास वाळु काढत गोदावरी नदी पोखरण्याचे पाप वाळु माफिया करत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडुन केला जात आहे.
माहितीनुसार, मोगरा गावात परराज्यातील सुमारे २० ते २५ पान २ वर

- **दिंद्रुड पोलिस, महसुल प्रशासनाची बघ्याची भूमिका**
- **वाळू काढण्यासाठी परराज्यातील कामगार मोगऱ्यात डेरेदाखल**
- **अवैध वाळू वाहतुकीने रस्त्याचे वाजले तीनतेरा**
- **शेतकरी, ग्रामस्थ हैराण**
- **चप्पु आणि दुचाकीने काढली जाते गंगाबाहेर वाळू**

## ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ.दिवाकर गुळजकर यांचे निधन

बीड दि.१७ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध व ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ.दिवाकर गुळजकर यांचे मंगळवार पहाटे २ वाजून २७ मिनिटांनी अल्पशा आजारामुळे निधन झाले, ते ५३ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे बीड जिल्ह्यातील वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



डॉ.गुळजकर यांनी अनेक वर्षे वैद्यकीय क्षेत्रात कार्य करत रुग्ण सेवेला प्राधान्य दिले. आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे पान २ वर

## बाजारपेठेत गर्दी

बीड दि.१७ (प्रतिनिधी):- रमजान ईद निमीत्त सध्या विविध वस्तू, कपडे, खाद्य पदार्थ इत्यादी खरेदी करण्यासाठी बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी उशिरापर्यंत बीड शहरातील कपड्यांच्या दुकानात गर्दी दिसून येत आहे.

## आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ; १ कि.मी.ची अट शिथिल



बीड दि.१७ (प्रतिनिधी):- शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेशासाठी सुरू असलेल्या ऑनलाइन प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची एक किलोमीटरची अट शिथिल करण्यात आली असून आता पालकांना तीन व पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळांचे पर्याय पान २ वर

### अशोक शेटे यांच्या मागणीला यश

## FSSAI परवाना वारंवार नूतनीकरणाची गरज संपली

### जिल्हा व्यापारी महासंघाकडून केंद्र सरकारचे आभार



बीड दि.१७ (प्रतिनिधी):- अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) अंतर्गत अन्न व्यावसायिकांना परवान्याचे वारंवार नूतनीकरण करण्याची सक्ती रद्द करण्याबाबत केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचे बीड जिल्हा व्यापारी महासंघाने स्वागत केले असून याबद्दल केंद्र सरकारचे आभार पान २ वर







# ज्योतिषाचार्य प्रगती शेटे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार



बीड दि.१७ (प्रतिनिधी):- आंतरराष्ट्रीय मानव अधिकार राजदूत संघटना पोलीस मित्र माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण सेना तसेच महाराष्ट्र युवा फाउंडेशन च्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार ज्योतिषाचार्य प्रचिती प्रशांत शेटे यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रदान करण्यात आला प्रचिती प्रशांत शेटे यांनी वास्तु चिकित्सक ज्योतिष्य आचार्य आणि अंकशास्त्र क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे पुण्यामध्ये झालेल्या विशेष कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश सकुंडे डॉक्टर महेश थोरवे आणि आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यापूर्वी अनेक मान्यवरांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे ज्योतिषाचार्य प्रचिती शेटे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गुढीपाडव्यापूर्वी सोन्या-चांदीच्या दरात घसरण

जळगाव दि.१७ (प्रतिनिधी):- गेल्या काही दिवसांत सातत्याने वाढणा-या किमतींमुळे सोनं खरेदी करणं सामान्य ग्राहकांसाठी अवघड झालं होतं. मात्र आता परिस्थितीत काहीसा बदल दिसून येत आहे. मागील तीन दिवसांत सोनं आणि चांदीच्या दरात लक्षणीय घट नोंदवली गेली आहे. त्यामुळे गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर दागिने खरेदी करण्याचा विचार करणा-यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



ऑल इंडिया सराफा असोसिएशन यांनी दिलेल्या माहितीनुसार आंतरराष्ट्रीय बाजारातील संकेत कमकुवत राहिल्यामुळे आणि अमेरिकन डॉलर मजबूत झाल्यामुळे मौल्यवान धातूंवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसून आला असून सोनं आणि चांदीच्या किमती घसरल्या आहेत. या घसरणीचा सर्वाधिक परिणाम चांदीच्या दरांवर दिसून आला आहे.सर्व करांचा समावेश करून चांदीच्या किमतीत सुमारे ९,००० रुपयांची मोठी घट झाली आहे. त्यानंतर चांदीचा दर प्रति किलोग्राम २,५६,५०० रुपयांवर आला आहे. सोन्याच्या किमतींमध्येही सलग तिस-या दिवशी घट झाल्याचे चित्र दिसून आले आहे. सध्या सोन्याचा भाव अंदाजे १,६०,२५० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवला जात आहे. मागील काही आठवड्यांत सातत्याने वाढलेले दर पाहता ही घट ग्राहकांसाठी दिलासादायक मानली जात आहे.



आज मुंबई येथे आमचे मार्गदर्शक कुडाळ-मालवण विधानसभा मतदार संघाचे आमदार निलेश नारायणराव राणे यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या मन:पुर्वक शुभेच्छा दिल्या. या वेळी स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख प्रा.सचिनभैय्या उबाळे पाटील, आदी उपस्थित मित्र परिवार.

## रब्बी हंगामातील 'ई-पीक पाहणी'ला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी):- राज्यातील रब्बी हंगाम २०२५-२६ मधील 'ई-पीक पाहणी' करण्याची मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधानसभेत केली. बावनकुळे म्हणाले की, २५ जानेवारी २०२६ पासून सहाय्यक स्तरावर ई-पीक पाहणीची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत रब्बी हंगामातील पिकांची केवळ ५५.६९ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ टक्के शेतकरी या नोंदणी प्रक्रियेपासून लांब आहेत. ही नोंदणी १०० टक्के पूर्ण व्हावी, या हेतूने सरकारने मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.पीक विम्यासह सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे.

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर एअरस्ट्राईक; ४०० जणांचा मृत्यू

कराची दि.१७ (वृत्तसेवा):- इस्रायल-इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा आज १८ वा दिवस आहे. अशातच पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात संघर्ष वाढला आहे. अफगाणिस्तानची राजधानी काबुलमध्ये पाकिस्तानने केलेल्या भीषण एअरस्ट्राईकमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे, सोमवारी मध्यरात्री हा प्रकार घडला आहे.

पाकिस्तानने केलेल्या एअर स्ट्राईकने काबुल येथील एक नशामुक्ती केंद्र उद्ध्वस्त झाले आहे. यात ४०० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर २५० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. पण पाकिस्ताने हे आरोप खोडून काढले आहेत. आम्ही कुठल्याही मानवी वस्तीवर हल्ला केलेला नाही, पाकिस्तानने म्हटले आहे.

पाकिस्तानच्या या एअरस्ट्राईकमुळे काबुलच्या संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मृत्यू झालेल्या व्यक्तींमध्ये अनेक रुग्ण आणि सामान्य नागरिकांचा समावेश असल्याचे तालिबान सरकारने म्हटले आहे.काबुलच्या एका नशामुक्ती केंद्रावर पाकिस्तानने हल्ला केला आहे. यात हॉस्पिटलचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला आहे. मृतांमध्ये अधिक व्यक्ती रुग्ण होते. उपचारासाठी ते याठिकाणी आले होते, असे तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी म्हटले आहे. हॉस्पिटलचा मोठा भाग या हल्ल्यात उद्ध्वस्त झाला आहे. ढिगा-याखाली अनेक लोक गाडले गेले असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला हा आकडा २५० सांगण्यात आला होता, मात्र अफगाणिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाने मृतांची संख्या ४०० पर्यंत वाढल्याचा दावा केला आहे. याशिवाय २५० हून अधिक लोक जखमी आहेत.

## महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये गारांचा पाऊस

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी):- राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाने आज झोडपलं आहे. सांगली, लातूर, धाराशिवमध्ये तर अक्षरश: गारांचा पाऊस पडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

हवामान विभागाकडून यलो अलर्ट

हवामान विभागाने सातारा आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला. या दोन जिल्ह्यांतील काही भागांमध्ये पुढच्या तीन तासांत विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पान १ वरून

## पेठ बीडमध्ये ६ वर्षाच्या बालिकेवर अत्याचार

सदर घटना घडल्यानंतर नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. ५-६ वर्षाच्या लहान लहान मुलीही सुरक्षीत राहिलेल्या नाहीत, त्यांनाही उचलून नेऊन जर असे घृणास्पद कृत्य घडत असेल तर अशा आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## आ.सुरेश धस यांची महाघोटाळ्यावर सभागृहात लक्षवेधी

दि. २८ सप्टेंबर २०१३ असा स्पष्ट उल्लेख आहे तसेच अंबाजोगाई नगर परिषदेकडून त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र २८ सप्टेंबर २०१३ रोजी देण्यात आलेले आहे. तरीही त्याच व्यक्तीस ९ एप्रिल २०२३ ते २० ऑगस्ट २०२३ या कालावधीत १०० दिवस कामावर दाखवण्यात आले. त्यांची २५ ऑक्टोबर २०२३ रोजी ऑनलाइन कामगार म्हणून नोंदणी करण्यात आली तसेच २० ऑगस्ट २०२३ रोजी स्वयंघोषणापत्रही घेण्यात आले.

यानंतर त्याच व्यक्तीचा पुन्हा मृत्यू दाखवत अंबाजोगाई नगर परिषदेकडून ३० ऑक्टोबर २०२३ रोजी दुसरे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात आले आणि त्यांच्या मुलगा गजानन कमलाकर मुळेगावकर यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यावर २ लाख ३० हजार रुपयांचे अनुदान जमा करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणासोबतच जय शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी देखील यासंदर्भात तक्रार दाखल केली असून विविध स्तरांवर या घोटाळ्याची माहिती पुढे येत असल्याचे आमदार धस यांनी नमूद केले.

आमदार धस यांनी पुढे सांगितले की बीड जिल्ह्यातील अनेक नगरपरिषद नगरपालिका तसेच काही ग्रामपंचायतींमध्ये अशा प्रकारचे प्रकार घडले आहेत. विविध ठिकाणी १६ १४ २० अशा स्वरूपात प्रकरणे आढळली असून त्यांच्या माहितीनुसार १०० पेक्षा अधिक तर प्रत्यक्षात २०० पेक्षा जास्त प्रकरणांचा संशय आहे. त्या काळात जिल्हा कामगार अधिकारी म्हणून मुंडे कार्यरत होते तसेच अजय काशीद यांची जोडी धाराशिव येथेही कार्यरत होती आणि तेथेही अशाच प्रकारचे गैरप्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला.

या घोटाळ्याची व्याप्ती अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की बीड जिल्ह्यात १ लाख ७१ हजार कामगारांची नोंद असून काही कामगारांची नोंद दुबईतील बुर्ज खलिफा येथे काम केल्याची तर काहींची नोंद अमेरिकेतील व्हाईट हाऊस येथे काम केल्याची आहे. हे कामगार बीडमध्ये कसे आले असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मृतांच्या नावावर अनुदान लाटण्याच्या प्रकारावर टीका करताना आमदार धस म्हणाले की हे केवळ मृतांच्या मळ्यावरचे लोणी नाही तर मळ्यावरचे २ लाख ३० हजार रुपये २०० लोकांनी खाल्ले असून निम्मे तुम्ही निम्मे आम्ही अशा प्रकारचे उद्योग झाले आहेत. या प्रकरणाची सचिव किंवा उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत आणि अनुदानाची वसुली करावी अशी ठाम मागणी त्यांनी सभागृहात केली.

दुबई आणि अमेरिकेतील कामगार नोंदीबाबत विशेष बाब अशी समोर आली की बीड जिल्ह्यातील काही कामगारांची नोंद दुबईतील बुर्ज खलिफा येथे काम केल्याची तसेच काहींची नोंद अमेरिकेतील व्हाईट हाऊस येथे काम केल्याची करण्यात आली आहे. परदेशात काम केल्याचे दाखवलेले हे कामगार स्थानिक योजनेत कसे नोंदवले गेले याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मंत्री आकाश फुंडकर यांनी उत्तर देताना सांगितले की हा विषय अत्यंत गंभीर असून आमदार सुरेश धस यांनी मांडलेले मुद्दे महत्त्वाचे आहेत. बीड जिल्ह्यात २०१५ ते २०२० या कालावधीत ११५ अर्ज प्राप्त झाले होते. तपासणीदरम्यान एकच अपघाती मृत्यू प्रकरण खरे आढळले असून इतर प्रकरणांत अनियमितता आढळली नाही. तथापि राज्यात मोठ्या प्रमाणावर बोगस एजंट खोटे कागदपत्र तयार करत असल्याचे त्यांनी मान्य केले. नगरपालिकांकडून खोटी प्रमाणपत्रे तयार होणे ही गंभीर बाब असल्याचे नमूद करत शासनाच्या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांना एकालाही सोडले जाणार नाही आणि सर्व दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असे ठाम आश्वासन त्यांनी दिले.

## मासेमारी करणारे कापूस, वीज पंपाचे वायर चोरतात

आदेश रद्द करण्यात यावा अशी मागणी अंकुश खरात, भागवत खरात, सुंदर खरात, माणिक खरात, दिलीप खरात, नारायण खरात, दीपक लिंबुरे, अशोक घुगे, अशोक झारगड, कुशाल खेडकर, अशोक पवार, अभिषेक खरात, कृष्णा खरात व कवडगाव येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## चहा देण्याचे निमीत्त करुन कॉप्यांचा पुरवठा

जातात व आपल्या जवळच्या पाल्यांना कॉप्या दिल्या जातात. शाळेच्या मागील बाजुच्या खिडक्यांमधून विद्यार्थ्यांना कॉप्या पुरविल्या जातात. या शाळेच्या केंद्र संचालकाने कडक उपाययोजना करावी व कॉप्या करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## अशोक शेटे यांच्या मागणीला यश...

व्यक्त केले आहेत.

यापूर्वी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी व्यापाऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन तत्कालीन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यावेळी परवाना नूतनीकरणाबाबत व्यापाऱ्यांना मोबाईलवर एसएमएसद्वारे पूर्वसूचना देण्याची मागणी मान्य करण्यात आली होती.

तसेच व्यापाऱ्यांवर वारंवार नूतनीकरणामुळे होणारा आर्थिक व प्रशासकीय ताण लक्षात घेऊन ही सक्ती रद्द करावी, अशीही मागणी करण्यात आली होती. आता केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्यामुळे व्यापारी वर्गाला मोठा दिलासा मिळाला असल्याचे महासंघाने म्हटले आहे. आता वारंवार ऱ्हैत करण्याची झंझट राहणार नाही, एकदा परवाना काढला की तो आजीवन वैध असेल तसेच नोंदणी साठी ची टर्नओवर मर्यादा देखील वाढवण्यात आली आहे.

या निर्णयामुळे लहान व मध्यम अन्न व्यावसायिकांना,किराणा व्यापारी, फेरीवाले यांना मोठा फायदा होणार असून कागदपत्रांची प्रक्रिया व खर्चही कमी होणार आहे. व्यापारी वर्गाच्या हिताचा हा निर्णय घेतल्याबद्दल बीड जिल्हा व्यापारी महासंघाने केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

## मोगऱ्याच्या नदीतून वाळुची चोरी....

तरुणांची टोळी काही दिवसांपासून डेरेदाखल झाली असून, ही टोळी गोदावरी नदीपात्रातून वाळू काढत आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार दिवसाढवळ्या सुरू असूनही संबंधित यंत्रणा कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. वाळू उपशासाठी पारंपरिक पद्धतीऐवजी चप्पू (हाताने चालवली जाणारी होडी) व दुचाकींचा वापर केला जात आहे. नदीपात्रातून वाळू काढून ती दुचाकीवरून बाहेर नेली जाते आणि नंतर मोठ्या वाहनांद्वारे तिची वाहतूक केली जाते. या अवैध वाळू वाहतुकीमुळे गावातील व परिसरातील रस्त्यांची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्डे पडले असून धुळीचे प्रमाण वाढल्याने ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतकरी व ग्रामस्थांनी याबाबत अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने ते हैराण झाले आहेत. रात्रंदिवस वाळू उपसा सुरू आहे, पण प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे. आमच्या रस्त्यांची वाट लागली असून शेतीकामात अडथळे निर्माण होत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया मोगरा ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राची हानी होण्याची भीती व्यक्त केली जात असून, भविष्यात पूरपरिस्थिती निर्माण होण्याचाही धोका तज्ज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे. पर्यावरणीय संतुलन बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर, संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून अवैध वाळू उपसा थांबवावा, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## डॉ.दिवाकर गुळजकर यांचे निधन...

आणि रुग्णांप्रती असलेल्या आपुलकीमुळे त्यांनी समाजात एक विश्वासार्ह व लोकप्रिय डॉक्टर म्हणून ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अकाली निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्यावर मंगळवार दिनांक १७मार्च २०२६ रोजी आमरधाम, मोंढा रोड, बीड येथे अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्र परिवार व असंख्य रुग्ण असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त करण्यात येत असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ...

निवडण्याची संधी मिळणार आहे.तसेच अर्जामध्ये दुरुस्ती किंवा नवीन अर्ज भरण्यासाठी २५ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.

दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आरटीई प्रवेशासाठी पालकांना केवळ निवासस्थानापासून एक किलोमीटर अंतरातील शाळाच निवडण्याची अट घालण्यात आली होती. मात्र, या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवित एक किलोमीटरची सक्ती योग्य नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शासनाने नियमांमध्ये सुधारणा करून पालकांना अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश न्यायालयाने दिले.

या आदेशानुसार शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रणालीमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. आता प्राधान्याने एक किलोमीटर, त्यानंतर तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर अंतरातील शाळांचे पर्याय पालकांना निवडता येणार आहेत. तसेच १६ मार्च २०२६ पर्यंत ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरले आहेत, त्यांना अर्ज 'अनकन्फर्म' करून पुन्हा 'कन्फर्म' करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालकांना पोर्टलवर पॉप-अप विंडोच्या माध्यमातून सूचना देण्यात येणार आहे. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारित नियम लागू करत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध झाल्याने आरटीई प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याचबरोबर अगोदर दाखल केलेले विद्यार्थ्यांना अर्ज अपडेट करता येणार असल्याची माहिती मनोज जाधव यांनी दिली आहे.

२२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकले ;
गोरगरीब विद्यार्थी प्रवेशाला मुकले

बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई, आष्टी व केज तालुक्यातील तब्बल २२ शाळांचे लोकेशन आरटीई पोर्टलवर चुकीचे अपलोड झाल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर परिणाम होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शाळांची नोंदणी व व्हेरिफिकेशन करण्यासाठी जवळपास एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. तरीही या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात त्रुटी राहिल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे अंबेजोगाई तालुक्यात सर्वाधिक शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवले गेले आहे. त्यामुळे शाळेजवळ राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनाही त्या शाळेत अर्ज करता येत नसल्याने पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लोकेशन चुकले की जाणीवपूर्वक चुकवले ? मनोज जाधव

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते मनोज जाधव यांनी सांगितले की, आरटीई पोर्टलवर शाळांचे लोकेशन चुकीचे नोंदवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. एखाद्या शाळेचे स्थलांतर करायचे असल्यास त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करून मंत्रिमंडळाची मान्यता घेतल्यानंतरच शासन निर्णयाद्वारे शाळेचे स्थलांतर करता येते. त्यानंतरच शाळेचे लोकेशन बदलणे शक्य असते.

अशी संपूर्ण प्रक्रिया असताना आरटीई पोर्टलवर शाळांचे लोकेशन चुकीच्या पद्धतीने कसे अपलोड झाले, यामागे शाळा प्रशासन की शिक्षण विभाग दोषी आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच संबंधित शाळांमध्ये आतापर्यंत दाखल झालेले अर्ज अनकन्फर्म करून नव्याने योग्य लोकेशन नोंदवून पुन्हा अर्ज मागवावेत, अशी मागणीही मनोज जाधव यांनी केली आहे.

पान ६ वरून

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या अथक पाठपुराव्याला ऐतिहासिक यश

२०२६ च्या 'अधिक मासात' (१७मे ते १५ जून) येथे जवळपास कोट्यावधी भाविक येण्याची शक्यता असून, त्या दृष्टीने मंदिर परिसराचे नियोजन व विकास युद्धपातळीवर करण्याची मागणी डॉ.शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे.केवळ सरकारी पदावर न राहता, समाजाचे आणि श्रद्धेचे देणे लागते या भावनेतून डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी या तीर्थक्षेत्राचा प्रश्न लावून धरला. त्यांनी अधिकाऱ्यांच्या समवेत पुरुषोत्तमपुरी येथे प्रत्यक्ष जाऊन अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या. तसेच फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या सविस्तर निवेदनात भाविकांची सुरक्षितता, अरुंद रस्ते आणि मूलभूत सुविधांचा अभाव याकडे लक्ष वेधले होते. डॉ. शेटे यांच्या या प्रामाणिक प्रयत्नांमुळेच आज पुरुषोत्तमपुरीच्या विकासाला एक नवी दिशा मिळणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी डॉ. शेटे यांच्या विनंतीची तात्काळ दखल घेत, या तीर्थक्षेत्राच्या विकासकामांसाठी आवश्यक निधी प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना निर्देशित केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या थेट हस्तक्षेपामुळे आता पुरुषोत्तमपुरीच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग सुकर झाला असून, विकास आराखड्याच्या अंमलबजावणीला ऐतिहासिक गती मिळाली आहे. तसेच या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी आढावा बैठक घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निर्देश दिले आहेत. पुरुषोत्तमपुरीचा विकास हा केवळ सरकारी प्रकल्प नसून, तो करोडो भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान आहे. आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेबांची विकासात्मक दूरदृष्टी व त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे देशातील एक प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून ते तीर्थक्षेत्र नावारूपास येणार आहे. तसेच त्याचे वैभव सातासमुद्रापार पोहोचेलअसे डॉ. ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती यांनी बोलतांना सांगितले.

## कोरडे दाम्पत्याची शेवगा शेती ठरतेय आदर्श

या यशस्वी प्रयोगामुळे परिसरातील अनेक शेतकरी शेवगा लागवडीकडे वळत असून शेतीतून आर्थिक स्थैर्य मिळविण्याचा विश्वास बळावत आहे. तालुक्यातील शेतक-यांनी उस, कापुस, सोयाबीन या पारंपारिक पिकाच्या मागे न लागता शेतीत नव - नविन प्रयोग करणे गरजेचे आहे. यातुन शेती किफायतशीर व फायदेशीर करता येते व चांगले उत्पन्न देखिल हाती येते. शेवगा शेतीतुन मोठ्या प्रमाणात आर्थिक स्थिती बदलली असुन यंदाही चांगला भाव मिळाला आहे. - संजीवनीताई रामकिसन कोरडे, फुलेपिंपळगांव.

## संजय उडाण यांच्या इफ्तार पार्टीला प्रतिसाद

महत्त्व अधोरेखित केले.या उपक्रमामुळे परिसरात सामाजिक समरसतेला चालना मिळाली असून, भविष्यातही अशा कार्यक्रमांद्वारे विविध समाजांमध्ये हिंदू मुस्लिम ऐक्य दृढ करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, स्थानिक नेतृत्वाच्या या प्रयत्नांचे नागरिकांनी कौतुक करत अशा उपक्रमांना अधिक प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम बी एन मित्र मंडळाने सहकार्य करत पार पाडला.

## समाधी महोत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण

आली असून, गड परिसर भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे.महोत्सवातील प्रमुख धार्मिक कार्यक्रमांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. निशाण प्रस्थान, कावड आगमन, महाआरती, जलाभिषेक व महापूजा या विधी सुरळीत पार पडावेत यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मार्गदर्शन केंद्रही उभारण्यात आले आहेत.देवस्थान ट्रस्टकडून भाविकांना शिस्त पाळण्याचे, स्वच्छता राखण्याचे तसेच प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः कावडधारकांसाठी वेळेचे नियोजन करण्यात आले असून, सर्वांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.एकूणच, सावरगाव येथे होणाऱ्या या 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'साठी जय्यत तयारी पूर्ण झाली असून, भक्तिमय वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## जामखेडमध्ये वाढत्या गुंडगिरी व टवाळखोरीमुळे नागरिकांमध्ये भीती

वाढल्याने नागरिकांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. सकाळी आणि सायंकाळी व्यायाम किंवा फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना, विशेषतः महिलांना, काही तरुण दुचाकीवरून वेगाने फिरत पाठलाग करून त्रास देत असल्याच्या घटना घडत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. तसेच काही निर्जन स्थळांवर आणि रस्त्याच्या कडेला उघडपणे धूम्रपान, मद्यपान तसेच इतर नशिल्या पदार्थांचे सेवन होत असल्याचेही नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. महिलांच्या दागिन्यांची चोरी करण्याचा प्रयत्न होणे, तसेच लहान मुलांसोबत असलेल्या महिलांना त्रास देणे अशा घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय बसस्थानक, खर्डा चौक आणि नागेश विद्यालय परिसरात शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींचा पाठलाग करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सकाळी ५ ते ८ आणि सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संबंधित परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, उघडपणे नशा करणाऱ्यांवर व टवाळखोरी करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी तसेच संशयास्पद हालचाली करणाऱ्या दुचाकीस्वारांची सखोल तपासणी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे. जामखेड शहरातील नागरिकांची सुरक्षितता आणि परिसरातील शांतता अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा सर्व सामान्य नागरिक व्यक्त करत असून यावेळी शहाजी काका राळेभात, नगरसेवक राजेंद्र गोरे, प्रशांत काका राळेभात, जावेद कुरेशी, इस्माईल भाई सय्यद, नासिर (चाचू) सय्यद,अर्चना ताई राळेभात, बिलाल शेख, सचिन शिंदे, प्रदीप शेटे, कुंडल राळेभा आकाश पिंपळे, बाबासाहेब मगर, संदिप (आण्णा ) गायकवाड, अमोल गिरमे, हरिभाऊ आजबे, दीपक घायतडक, बजरंग डुचे,दत्ता डिसले यांच्यासह इतर पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## रुद्रप्रतापसिंह तौर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र

आहे. तो सैनिकी स्कूल प्रवेशासाठीसाठी देखील पात्र ठरला आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, दयानंद तोष्णीवाल, विलासराव लांडगे , संतोष कोथाळकर, प्रभाकराव कचरे, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब कचरे, उपाध्यक्ष विजय साळवे, शिक्षणप्रेमी नागरिक डॉ. जनक चौरे, मुख्याध्यापक अशोक कचरे यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हा परिषद शिक्षकांची 'बीएलओ' नियुक्ती ग्रामीण शिक्षणावर परिणाम

परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

## श्री युवा माहेश्वरी बीडच्या अध्यक्षपदी तापडिया तर सचिवपदी डागा यांची निवड

कमलेश रांदड, सचिन लड्डा, महेश लड्डा, अमित मंत्री, शुभम सिकची, अमित बाहेती, अभिजित दोड़े, श्रीकांत बियाणी, आशिष चरखा, मयुर काबरा, प्रसाद रांदड, अजय लड्डा, अनिल लड्डा, ऋषीकेश मानधने, पवन भक्कड, संतोष सोमाणी, संकेत टवानी,आकाश चरखा, आनंद चांडक डॉ रमण बियानी, सीए न्यानेश चरखा, रुपेश मानधने, अनुज चरखा, महेश बियानी, संकेत तापडिया, सीए ऋषीकेश मूंदड़ा यांची उपस्थिती होती.

## शिक्षक कैलास उघडे यांना आत्महत्येस प्रवृत्त प्रकरणी दोन जणावर गुन्हा दाखल

याप्रकरणी आज दिनांक १७ मार्च २०२६ वार मंगळवार रोजी १६:५९ या दरम्यान तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन कैलास उघडे यांचे वडील बाबुराव उघडे यांनी गोरकर सर आणि श्रीराम शेळके यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भारतीय न्याय सहिता १०८,३(५) नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास तलवाडा पोलीस करत आहे

## कचरा टाकून घाण करणारे लोकांविरोधात दंडात्मक कारवाई करावी

एक प्रकारे लगाम बसेल. काही दिवसापूर्वी या परिसरातील नागरिकांनी येथील कचरा डेपो हलवण्यात बद्दल नगरपरिषदेकडे तक्रार केली होती. याची नगरपरिषदेने दखल घेऊन हा परिसर स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला परंतु येथील या परिसरातील काही व्यावसायिक व नागरिक या ठिकाणी कचरा टाकून पहिल्यासारखा हा परिसर विद्रूप करीत आहेत. त्यासाठी नगरपरिषदेने या प्रकाराची दखल घेऊन जनजागृतीच्या दृष्टीने जनतेच्या माहितीस्तव बोर्ड लावावेत अशी नागरिकांनी मागणी शाम मार्कंडे यांनी प्रसिद्धीच दिलेल्या पत्रकातून केली आहे.

**CHANGE IN NAME**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME : PADMABAI SANTOSH TAVANI**
**NEW NAME : PADMA SANTOSH TAWANI**

PRESENT ADDRESS: W/O SANTOSH TAWANI, OPP. GANAPATI MANDIR, HO. NO. 3-15-128, BADRI VISHAL, VIPRA NAGAR, VTC: BID DISTRICT: BEED STATE: MAHARASHTRA
PIN CODE: 431122

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १८ मार्च २०२६ पान –३


## साने गुरुजी निवासी विद्यालयास (ए+) दर्जा प्राप्त

केज दि १७ (प्रतिनिधी) - शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळां साठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. यातच सन २०२४-२५ मध्ये राज्या तील १,०२,६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. सन या स्वयं मूल्यांकनामध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळां पैकी सन २०२५-२६ मध्ये १०,७१२शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात आली होती.त्यापैकी १०,६४४ शाळांचे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. यात केज येथील, साने गुरुजी निवासी प्राथमिक विद्यालय केज, साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज, व साने गुरुजी उच्च माध्यमिक विद्यालय केज याविद्यालय केज, व साने गुरुजी उच्च माध्यमिक विद्यालय केज या तीनही शाळांना स्वयं मूल्यांकन व त्रयस्थ व्यक्तींकडून केलेले बाह्य मूल्यांकन यात सर्वाधिक गुणप्राप्त होऊन (ए+) श्रेणी प्राप्त झाली आहे.

राज्यातील ४० शाळांमध्ये या तीनही शाळा असून नुकतेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणसंस्था अंबेजोगाईच्या वतीने शाळेस अभिनंदनाचे पत्र प्राप्त झाले आहे. दर्जा प्राप्त झाल्यानंतर शाळेच्या दर्शनी भागात व शाळेच्या लेटरहेडवर (ए+) श्रेणी प्राप्त असा उल्लेख करण्याचे आदेश पत्रान्वये देण्यात आलेले आहे. केज तालुक्यातून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित, साने गुरुजी निवासी विद्यालय तीनही शाळां (ए+) श्रेणी आल्याबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबेजोगाई चे प्राचार्य डॉ. अनिल मुरकुटे सर, सहाय्यक आयुक्त कार्यालय बीडचे सहाय्यक आयुक्त क्षिरसागर , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबेजोगाईच्या वरिष्ठ अधि व्याख्याता डॉ. भागीरथी गिरी तालुक्याचे समन्वयक व वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. जयपाल कांबळे सर, डॉ. गोरे सर, डॉ. सुरवसे सर, डॉ. देशमुख सर, बारगजे सर, गटशिक्षणाधिकारी कार्यालय केजचे गटशिक्षण अधिकारी सुनील केंद्रे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता आबा चाटे, केज केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चौरे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## ज्या धरणामुळे बेघर व भूमिहीन झाले त्याच धरणात उपोषण करण्याची कर्झणीकरावर वेळ

बीड दि १७(प्रतिनिधी) - बीड शहरासाठी काही दिवस पाणी पुरवठा करणारे तालुक्यातील खटकाळी धरण. ज्या धरणामुळे ७३ कुटूंब बेघर झाले व भूमिहीन झाले तेच कुटूंब शासनाने वाऱ्यावर सोडले असल्याने या कुटुंबावर धरणामध्येच उपोषण करण्याची वेळ आली आहे.सन १९७२ साली खटकाळी धरण झाले होते, त्या वेळेस सरकारने कर्झणी ग्रामस्थांना सरकारी गायरान गट नंबर १५८ मध्ये जागा दिली होती. तेंव्हापासून आजपर्यंत त्या जागेत कर्झणी हे गाव वसले आहे, त्या ठिकाणी शाळा, मंदिर, सभामंडप, घरे आहेत. परंतू ती जागा आता सरकारने वनविभागास दिली आहे, त्यामुळे आता त्या जागेत कोणताही विकास करण्यात येत नाही, घर बांधता येत नाही, कारण वन विभागातील अधिकारी काम अडवतात, रस्ता करता येत नाही, ती जागा शासनाने धरणग्रस्त गावासाठी देण्यात यावी. यासाठी दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सर्व गावकरी, ग्रामस्थ धरणात उपोषणासप बसणार आहेत असे प्रसिध्दीकाद्वारे म्हटले आहे.

# मोदी साहेब,दुसऱ्यांदा आम्हाला रांगेत उभे केले की हो नोटाबंदीची आठवण काढत गॅस धारक सांतापू लागले

बीड दि १७ (प्रतिनिधी)- आखाती युद्धामुळे पेट्रोल डिझेल गॅस या इंधनाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात टंचाई भासेल अशा आवया उठवल्याने सुरुवातीस पेट्रोल पंपावर रांगाच्या रांगा दिसून आल्या. तशा घरगुती गॅसच्या संदर्भात ही रांगा लागू लागल्या. त्या आज देखील कायम आहेत. बीड शहरातील दोन गॅस एजन्सी गोडाऊन वर गॅस घेण्यासाठी उन्हा तानात रांगा लावताना गॅस धारक दिसत असले तरी कुणाला गॅस मिळत नाही असे नाही . परंतु गॅस साठी कोणता व्यावसायिक , अधिकारी रांगेत उभे राहिलाय ? या रांगा फक्त सर्वसाधारण लोकांसाठीच आहेत. पंतप्रधान मोदी यांनी धन दांडग्यांचे स्वीच बँकेमधील पैसे उघडकीस आणण्यासाठी नोटाबंदी केली. नोटा बदलून घेण्यासाठी दिवसभर बँकेसमोर रांगा लावण्याची वेळ आली. नोटाबंदीचा नंतर मोदी साहेब दुसऱ्यांदा आम्हालाच रांगेत उभे केले की हो! असे म्हणत गॅस एजन्सीच्या संदर्भात देखील संताप व्यक्त केला जाऊ लागला.

या संदर्भात माहिती आशिकी, आखाती युद्धाचे परिणाम आपल्याला चांगलेच भोगावे लागतील अशा समजुतीने नागरिकांनी पेट्रोल पंपावर गर्दी केली. परंतु दोन दिवसा नंतर पुन्हा पेट्रोल डिझेल घेण्यासाठी कुठेही गर्दी झाली नाही. मागेल त्याला पाहिजे तेवढे पेट्रोल डिझेल मिळत आहे. ग्रामीण भागातील पेट्रोल पंपावर तर पंपा वरील कर्मचाऱ्याला ग्राहकाची वाट बघत बसण्याची वेळ आली असे चित्र दिसून येते. तर दुसरीकडे घरगुती गॅस साठी मात्र नागरिकांची तारांबळ उडत आहे. नोंदणीसाठी रांगेत उभे राहावे लागते. त्यानंतर सिलेंडर घ्यायला गॅस एजन्सीच्या गोडाऊन वर जावे लागते .तिथे सिलेंडर ग्राहकासाठी निवाऱ्याची कसलीही सोय नसल्याने बीड मधील संबंधित गोडाऊन वर उन्हातान्हात नागरिक रांगा लावत आहेत. अगोदर नोंदणी करून व केवायसी करून देखील पुन्हा तिथं केवायसी करावी लागते. नियमावर नियम लावले जात असून रिकामे गॅस सिलेंडर एका बाजूला ठेवून एकीकडे त्यावर लक्ष तर दुसरीकडे नोंदणी करण्यासाठी धावपळ यामुळे गॅस ग्राहक यांच्यावर वैतागण्याची वेळ आली आहे. साहजिकच संताप जनक प्रतिक्रिया ऐकायला मिळू लागल्या. घरपोच सिलेंडर देणारे गॅस एजन्सीवाले आता ग्राहकाबरोबर सभ्यतेची भाषा देखील करेनात असे चित्र दिसून येत आहे. केसोना गॅस एजन्सीवर पंधरा-वीस मिनिट रांगेत उभे राहिले तर गॅस मिळतो. मात्र दुसऱ्या एका एजन्सीवर चार चार तास उन्हातानात उभे राहावे लागते असे नागरिकांनी नमूद करताना मोदी साहेबांनी बड्या लोकांचा स्वीच बँकेतील पैसा उघडकीस आणण्याच्या नावाखाली नोटाबंदी केली.

ती यशस्वी झाली अथवा नाही ? हा भाग वेगळा परंतु नोटा बदलून घेण्यासाठी घराघरातील व्यक्तीला मात्र दिवसभर बँकेच्या खिडकीसमोर रांगेत उभे राहण्याची वेळ आली. तीच अवस्था सध्या दिसून येत आहे. विशेष म्हणजे या रांगेमध्ये अद्याप तरी कोणत्या खानावळीचा चालक, कोणत्या बारचा चालक, किंवा कोणत्या भोजनालयाचा चालक किंवा त्यांचे कर्मचारी सिलेंडर साठी रांगेत उभे असल्याचे दिसून आलेत का ? असा सवाल करत मोदी साहेबांनी दुसऱ्यांदा फक्त आम्हालाच रांगेत उभे केले हो, अशी प्रतिक्रिया देखील व्यक्त केल्या गेली.

## अल्ताफ शेख यांच्या आगामी चित्रपटात राहुल रॉय झळकणार

बीड दि १७ (प्रतिनिधी) - सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा बीड जिल्ह्याचे जावई व हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीतील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध चित्रपट लेखक, दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार आणि अभिनेते असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले अल्ताफ दादासाहेब शेख यांनी आपल्या आगामी चित्रपटासाठी प्रचंड गाजलेल्या आशिकी या चित्रपटाचे मुख्य नायक असलेले अभिनेते राहुल रॉय यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत आगामी चित्रपट करण्याबद्दल बोलणे केले. यावर राहुल रॉय यांनी होकार दिला.

राहुल रॉय यांनी अल्ताफ शेख यांना अत्यंत आपुलकीने भेट देऊन बऱ्याच विषयांवर चर्चाही केली. शिवाय अल्ताफ शेख यांनी आतापर्यंत हिंदी-मराठी चित्रपट सृष्टीत अनेक चित्रपटाचे दिग्दर्शक, लेखक, गीतकार, संगीतकार, अभिनेते म्हणून केलेले अष्टपैलू कार्य चांगले असल्याचे म्हटले. आगामी हिंदी चित्रपटात ही जोडी सोबत काम करणार आहे.

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील आजच्या संजीवन समाधी सोहळ्यास उपस्थित रहा-प्रा.अजित इथापे



आष्टी दि १७ नगर -बीड जिल्ह्याच्या सरहद्दीवर आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील गर्भगिरी डोंगरावर बुधवार दि १८ मार्च रोजी, सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत चालणाऱ्या चैतन्य मच्छिंद्र नाथांच्या संजीवन समाधी सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन नाथ भक्तातर्फे प्रा.अजित इथापे यांनी केले.

देशभरातील लाखो भाविक भक्तांचे व अठरा पगड जाती धर्माचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड (मायंबा) आहे .येथे चैतन्य मच्छिंद्र नाथांची जगातील एकमेव संजीवन समाधी आहे. गुढी पाडव्याच्या आधीच्या दिवशी म्हणजेच फाल्गुन अमावास्येला नाथ भक्तांनी कावडीने पैठण, काशी व इतर तीर्थक्षेत्र ठिकाणावरून आणलेल्या पवित्र गंगा जलाने समाधीस जलाभिषेक केला जातो. बुधवारी सायंकाळी चार वाजेपासून पहाटे पर्यंत नाथांच्या समाधीस उटणे ,सुगंधी मसाले,चंदन उटीलेप लावणे कार्यक्रम असतो. भाविक भक्त अंघोळ करून ओल्या कपड्याने सेवेचा लाभ घेतात. हा महोत्सव पहाटेपर्यंत चालू असतो. सूर्योदयापूर्वी नवीन वस्त्राने समाधी झाकली जाते. महाआरतीनंतर नवीन वर्षानिमित्त (गुढीपाडवा) मुक्तद्वार दर्शन सर्वासाठी सुरू होते.

मच्छिंद्रनाथ गडाचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान समितीचे अध्यक्ष दादासाहेब चितळे,उपाध्यक्ष बाबासाहेब म्हस्के, सचिव बाबासाहेब मस्के, रमेश ताठे, ॲड. साहेबराव म्हस्के, नवनाथ म्हस्के, चंद्रकांत लोखंडे, शशिकांत चंदनशिव, राजेंद्र म्हस्के सरपंच सह ग्रामस्थ व नाथभक्त हे सोहळ्यास येणाऱ्या भाविक भक्तांच्या सोई सुविधाकडे विशेष लक्ष देतात. अशा या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाग करणे उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. अजित ईतापे सर यांनी केले आहे.

## निषाद बोरगावकर याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भटक्या श्वानांना मेजवानी

अंबाजोगाई दि १७ (प्रतिनिधी) - माणसाप्रमाणेच भटक्या प्राण्यांनाही निसर्गाने जगण्याचा अधिकार दिलेला आहे. प्राणीमात्रावर दया करणे हा मानवी मनाचा मूळ स्वभाव आहे. अंबाजोगाई शहरामध्ये भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा उर्फ काकाजी यांनी १७ नंबर येथे भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर उभारणीचा निर्णय घेतला आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी ही सुरू झाली. या शेल्टरमध्ये अंबाजोगाई शहरातील अनेक भटक्या कुत्र्यांना आणून ठेवण्यात आलेल आहे. या भटक्या कुत्र्यांसाठीच आज चि. निषाद प्रकाश बोरगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त या भटक्या कुत्र्यांना मेजवानी दिली.

कोरोना सारख्या महाभयंकर काळात सर्वजण आपापल्या घरात असताना भटक्या प्राण्यांसाठी बोरगावकर कुटुंबीयांनी नगरपरिषदेच्या सहकार्याने एक घास तुमचा हा अभिनव उपक्रम राबविला होता. आता निषादच्या वाढदिवसानिमित्ताने १७ नंबर येथे ठेवण्यात आलेल्या भटक्या कुत्र्यांसाठी मेजवानीचा खास बेत आयोजित केलेला होता. काकाजींच्या प्रेरणेतून राबवण्यात आलेल्या या उपक्रमासाठी सौ सुनंदा प्रकाश बोरगावकर, शशिकांत गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, बालाजी शेरेकर, अजय राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## मंत्री ना.संजय शिरसाट यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार संपन्न



केज दि १७ (प्रतिनिधी) - सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक तसेच बाळासाहेब सानप हे केज येथे सदिच्छा भेटी साठी रविवार दि. १५ मार्च रोजी आले असता त्यांचा शिवसेनेच्या वतीने उपनेत्या तथा माजी आमदार सौ. संगीताताई ठोंबरे, प्रा. विजयप्रकाश ठोंबरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, तालुका सचिव विकास काशीद, महिला आघाडी तालुकाप्रमुख जयाताई राऊत, शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, ज्येष्ठ नेते मालोजी नाना गलांडे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, ज्येष्ठ नेते डॉ. संतोष बुडूक, अभिजीत घाटूळ, संदीप नाईकवाडे, अशोक जोगदंड, बळीभाऊ चाटे, बलवंत सिंग गोके यांच्या सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी केज तालुक्यातील विविध विकास कामांबाबत ना. संजय शिरसाट यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच तालुक्यातील प्रलंबित विकास कामांसंदर्भात निवेदन देण्यात आले आणि आजपर्यंत केलेल्या कार्याचा कार्य अहवालही सादर करण्यात आला.

## टाक यांना बंगला जळीताची नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित -नागरिक

परळी, दि. १७ (प्रतिनिधी) परळी शहरातील गिते पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या विद्यानगर भागात रविवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास भिषण आग लागुन प्रतिष्ठित नागरिक अरुण टाक यांचा बंगला पूर्णपणे जळून खाक झाला. यासंदर्भात तालुका प्रशासनाने याची दखल घेऊन टाक यांना आर्थिक सहकार्य करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन या निमित्ताने नागरिकांमधून होत आहे. पेट्रोल पंपाच्या अगदी जवळ हे घटना घडली असल्याने परिसरात मोठी भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. आगीचे प्रचंड लोट दूरवरूनही दिसत असल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता आग विझवण्यासाठी आणि ती इतर ठिकाणी पसरण्यापासून रोखण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले असले तरी बंगल्याचे नुकसान झाले ते झालेच या आगीत मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले असून शासनाकडून वीज पडून किंवा आगीमुळे नुकसान झाले तर त्याची भरपाई दिली जाते . त्या अनुषंगाने टाक यांना तालुका प्रशासनाने सहकार्य करणे अपेक्षित असल्याचे नागरिकांचे म्हणणे येत आहे.

## नगराध्यक्ष झाले तरी काकाजी यांची लग्न समारंभास उपस्थिती कायम





चिंचोली माळी दि १७(प्रतिनिधी)- गोरगरिबांच्या मदतीला धावून येणारे व सुखदुःखात सहभागी होणारे म्हणून ज्यांचे नाव घेतले जाते ते नंदकिशोर मुंदडा अर्थात काकाजी यांच्या गळ्यात अंबाजोगाई नगर अध्यक्ष पदाची माळ फोडली तरी त्यांनी धार्मिक व लग्न समारंभास उपस्थित राहण्याचे कायम ठेवले आहे त्या अनुषंगाने ठिकठिकाणी झालेल्या लग्न समारंभास उपस्थित राहून त्यांनी वधूवरांना शुभ आशीर्वाद देण्याबरोबरच उपस्थित निमंत्रित पाहुण्यांची आष्ठीवाईकपणे चौकशी देखील केली.

केज मतदार संघात विविध विविध ठिकाणी शुभ मुहूर्तावर सामाजिक,पारिवारिक व विवाह सोहळ्यांचा धूम धडाका सुरू झाला आहे. जवळचे असो की अनोळखी असो ज्यांनी फोन केला निमंत्रण दिले त्यांच्या लग्न समारंभास नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांनी उपस्थित राहून उपस्थितांशी स्नेहपूर्ण संवाद साधत मनःपूर्वक शुभेच्छा चालवले. त्यांनी मुथ्था परिवारातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहून नवदांपत्यास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. चंदनसावरगाव, येथे चौधरी - जोगदंड परिवारातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहून नवदांपत्याला शुभेच्छा दिल्या. अंबाजोगाई येथे ठोंबरे - जाधव परिवारातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहून नवदांपत्याला शुभेच्छा दिल्या. सनगाव येथे अंजान परिवारातील गृहप्रवेश सोहळ्यास उपस्थित राहून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. अंबाजोगाई,माजी सैनिक कॉलनी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित महाप्रसाद कार्यक्रमास उपस्थित राहीले.तर शेपवाडी येथील शेप परिवारातील गृहप्रवेश सोहळ्यास उपस्थित राहून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या

## किशोर जगताप यांची महाराष्ट्र व्हेटरन्स क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड

बीड दि १७(प्रतिनिधी)- आपल्या क्रीडा क्षेत्रातील दीर्घ अनुभव, आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर अनेक वर्षे समाजात स्थान निर्माण करणारे किशोर जगताप यांच्यार्याची दखल घेत महाराष्ट्र व्हेटरन्स क्रिकेट असोसिएशनने उपाध्यक्षपदी निवड करून त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे, याबद्दल त्यांच्यावर क्रिकेट प्रेमी मधून व राजकारणी मंडळी मधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

क्रिकेटसारख्या लोकप्रिय आणि प्रेरणादायी खेळाच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन देणे, व्हेटरन्स खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि राज्यातील क्रिकेट संस्कृती अधिक बळकट करणे हे अगोदर पासूनच किशोर जगताप यांनी कार्य चालवलेले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र व्हेटरन्स क्रिकेट असोसिएशन अधिक सक्षम होऊन खेळाडूंच्या हितासाठी नवे उपक्रम राबवेल असे अपेक्षा या निवडीच्या निमित्ताने क्रिकेट प्रेमी मधून व्यक्त केली जात आहे तसेच या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## स्वा.सैनिक तथा शिक्षक शंकरराव काळेगावकर यांच्यावर हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार



केज दि १७ (प्रतिनिधी) स्वातंत्र्य सैनिक तथा माजी सैनिक आणि जिल्हा परिषदेचे माजी शिक्षक , शंकरराव काळेगावकर यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्यावर १६ मार्च रोजी सायंकाळी क्रांतीनगर येथील स्मशानभूमीत हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार झाले.

शंकरराव काळेगावकर हे अतिशय शिस्तप्रिय व स्वावलंबी असे करारी बाण्याचे व्यक्तिमत्त्व होते. भारतीय सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्य केले हे जिल्हा परिषदेच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या हैदराबाद मुक्ती संग्रामात सुद्धा त्यांचे योगदान होते. विविध शासकीय कर्मचारी तथा राजकीय पदाधिकारी यांचे शिक्षण त्यांच्या हातात घडवले दिनांक १६ मार्च रोजी पहाटे ३.४५ वाजण्याच्या दरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले.तसे

सायंकाळी ५ क्रांतीनगर केज या ठिकाणी अंत्यविधी पार पडला. यावेळी स्वातंत्र्य सैनिक म्हणून केज तहसीलच्या वतीने मंडळ अधिकारी भालेकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली तसेच त्यांचा विद्यार्थी वर्ग याशिवाय सर्व क्षेत्रातील हजारो लोक अंत्यसंस्काराला उपस्थित होते.

## माजलगावात श्री क्षेत्र कुशावर्त मंगलनाथ मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



माजलगाव दि १७ (प्रतिनिधी) -श्री क्षेत्र कुशावर्त मंगलनाथ मंदिर, बायपास रोड माजलगाव येथे चैत्र शुद्ध रामनवमी निमित्त दि. २६ मार्च ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद्? ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच संगीत तुलसी रामायण कथा ज्ञानयज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी श्री विष्णु सहस्त्रनाम पाठ, ज्ञानेश्वरी पारायण, संगीत तुलसी रामायण कथा, हरिपाठ तर रात्री ८ ते १० हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असा धार्मिक कार्यक्रम होणार आहे.या सप्ताहातील कथा प्रवक्ते म्हणून भागवताचार्य विष्णु महाराज देशमुख (कनकेश्वर आश्रम, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संत सितारामजी महाराज (संस्थापक, श्री मंगलनाथ मंदिर) यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.सप्ताहादरम्यान दि. २६ मार्च रोजी भागवताचार्य विष्णु देशमुख व रामायणाचार्य शिवचरित्रकार गोपाळ थोटे, दि.२७ मार्चरोजी शंकर चिंचकर (बीड), दि. २८ मार्चरोजी जालिंदर नेहरकर (केज), दि. २९ मार्चरोजी सिद्धेश्वर गाडेव तुकाराम शासी, दि. ३० मार्चरोजी विशेष कीर्तन कार्यक्रम, दि. ३१ मार्च रोजी जमावणाचार्य चिन्मय तेडके (बीड), दि. १ एप्रिल रोजी महादेव इन्कन तर दि. २ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत गोविंद महाराज नाईकवाडे (गेवराई) यांचे कीर्तन होणार आहे.या सप्ताहात दररोज अन्नदान, महाप्रसाद होणार असून सप्ताहाची सांगता चैत्र शुद्ध पौर्णिमा दि. २ एप्रिल रोजी होणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कथेचे यजमान सौ.ज्योती भाभी नारायण डक,सौ. शर्मिष्ठा तुषार डक, महाप्रसादाचे यजमान डॉ. सचिन लक्ष्मणराव डक, मंगलनाथ मंदिराचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर जाधव आर.जी कानाडे यांनी केले आहे

## भीमनगर जयंतीच्या अध्यक्षपदी सचिन टाकनखार

माजलगाव दि.१७ (प्रतिनिधी)- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यासाठी शहरातील भीमनगर जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी

समितीच्या अध्यक्षपदी सचिन टाकणखार यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी किशोर सातपुते, कोषाध्यक्षपदी शिशिर प्रधान, सचिवपदी अनिल डोंगरे, सहसचिवपदी रवि सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच राहुल मस्के यांची संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय समितीच्या सल्लागारपदी प्रदीप पट्टेकर, कपिल वाघमारे व सदानंद प्रधान यांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शक म्हणून कचरु तात्या खळगे, राजेश साळवे, नवनाथ धाईजे व अंकुश जाधव यांचा समावेश करण्यात आला आहे.

या जयंती उत्सवानिमित्त भीमनगर परिसरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या बैठकीस अंबऋषी स्वामी, टी. आर. जावळे, प्रदीप साळवे, राजेंद्र टाकणखार, गणेश जावळे, अक्षय साळवे, संतोष घाडगे, संजय ससाणे, गौतम टाकणखार, संदेश डोंगरे, राहुल निसर्गंध, विजय राऊत, रवि टाकणखार, प्रकाश शिंदे, राम गायकवाड, विजय पोळ, नरहरी जावळे, दिनेश धाईजे, अनंत वाघमारे, राजरत्न खळगे, राजपाल जावळे, सचिन वाघमारे, सतीश स्वामी, शंकर चव्हाण, दिलीप भालेराव, नितीन ससाणे, अनंत कांबळे, गब्बर ससाणे, निलेश कांबळे, प्रवीण निसर्गंध, मुसा धापसे, धम्मपाल जावळे, आकाश सावंत, केतन प्रधान, प्रवीण ओव्हाळ, सिद्धार्थ लोखंडे, साजण साळवे, स्वप्नील स्वामी, भारत ओव्हाळ, प्रकाश खळगे, सुशांत फुलवरे, राज सोनवणे, सिद्धार्थ निसर्गंध, सचिन पट्टेकर, नंदकिशोर निसर्गंध, संदेश निसर्गंध, अनिल गाडेकर, ऋषिकेश पट्टेकर, आदेश धाईजे, संकेत खळगे, दिपक साळवे, दिपक शिंदे, अमोल खळगे, मंगेश पोळ, सतीश जाधव, मिलिंद खळगे, ऋषिकेश, सोनवणे, विशाल सोनपसारे, सुबोध खळगे, विनोद शिंदे, सुजल खळगे, ॲड.चेतन सातपुते, मयुर प्रधान, रुपेश वाल्मिकी, रितेश शिनगारे, अमोल गायकवाड, सारंग स्वामी, रविराज भालेराव, विश्वजित साळवे, राहुल कांबळे, पवन उजगरे, निखिल टाकणखार, अविनाश गायकवाड, झग उजगरे, लखन निसर्गंध, शशिकांत साळवे, भागवत गाडेकर, प्रकाश निसर्गंध, गोगा कांबळे, किरण जावळे, प्रतीक जाधव, गब्बर निसर्गंध, आशिष धाईजे आदी उपस्थित होते.

## श्रीराम मंदिर अंबाजोगाई येथे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

अंबाजोगाई दि १७- (प्रतिनिधी)- - अंबाजोगाई शहरातील भट गल्ली,चौभारा,जैन गल्ली, पाटिल गल्ली,, जिरेगल्ली,सातपुते गल्ली यासह श्रीराम मंदीर अंबाजोगाई येथे हिंदू संमेलन उत्साहात संपन्न झाले .

या संमेलनाचे प्रास्ताविक विश्वहिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉ गोपाळराव चौसळकर यांनी केले , याच बरोबर गदाधरबुआ रामदासी यांनी माहिती दिली,हिंदू संमेलन का आवश्यक आहे.हिंदूंना एकत्र येण्याची काय गरज आहे,त्याच बरोबर हिंदूंच्या प्रत्येक घरातून चांगले संस्कार घडवावेत असे लातूर येथून आलेले तोडकर यांनी सांगितले, मान्यवरांचे स्वागत कॅप्टन सुंदर खडके यांनी केले तर,श्रीकुलकर्णी सर यांनी अतिशय मधुर आवाजात पसायदान म्हणून केले. यावेळी राम घोडके यांनी प्रसाद व्यवस्था केली आणि ''हिंदू जगरची १०० वर्षे''पुस्तके वाटप करण्यात आली. या कार्यक्रमात उल्हास पांडे ,मुकुंद घाटे, प्रभाकर सेलमोकर,अनंतराव देशपांडे,भास्कर देशपांडे,अभय जोशी,तसेच विश्व हिंदू परिषद, विविध हिंदू संघटना, आणि मोठया प्रमाणात हिंदू बांधव- भगिनी यांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## काँग्रेसच्या संविधान प्रेमाचे ढोंग उघडे

काँग्रेसने लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांच्या विरोधात अलीकडेच अविश्वास ठराव आणला होता. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात बोलू दिले जात नाही, असे कारण या अविश्वास प्रस्तावामागे देण्यात आले होते. भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय लोकशाही आघाडीची लोकसभेतील सदस्य संख्या लक्षात घेता हा ठराव फेटाळला जाणार हे स्पष्टच होते. मात्र त्यापूर्वी झालेल्या चर्चेत काँग्रेस आणि राहुल गांधींच्या लोकशाही, संविधान प्रेमाचे पितळ उघडे पडले. या चर्चेत सहभागी होताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधींकडून, आपल्याला बोलू दिले जात नसल्याच्या कांगाव्याचा बुरखा टराटरा फाडला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधींच्या सभागृहातील वर्तनाचा पाढा वाचला. लोकसभेत बोलण्यासाठी वेळ दिला जातो तेव्हा राहुल गांधी बोलत नाहीत, पण नंतर बाहेर जाऊन त्यांना बोलू दिले नाही अशी तक्रार करतात, लोकसभेतील पक्षीय बलाबल पाहता जागांच्या प्रमाणात पाहिले तर लोकसभा अध्यक्षांनी काँग्रेसला भाजपपेक्षा सहा पट जास्त बोलण्याचा वेळ दिला आहे. लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव विरोधकांनी आणला, पण विरोधी पक्षनेते राहुल गांधी स्वतः त्या प्रस्तावावर बोलले नाहीत. अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या संसदीय सत्रांच्या वेळी राहुल गांधी अनेकदा जर्मनी, व्हिएतनाम, इंग्लंड, सिंगापूर आणि मलेशिया या देशांच्या दौऱ्यावर होते, असे ठळक मुद्दे अमित शहा यांनी लोकसभेतील आपल्या भाषणात मांडून काँग्रेसची बोलती बंद केली. लोकसभाध्यक्ष कोणत्याही पक्षाचे नसून संपूर्ण सभागृहाचे आणि सर्व सदस्यांच्या अधिकारांचे रक्षक असतात. असे असताना काँग्रेसने गेल्या काही वर्षांत लोकसभा अध्यक्षांच्या विरोधात हेतुपूर्वक गैरसमज पसरवणारी मोहीम हाती घेतली आहे. लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग यासारख्या संविधानाने निर्माण झालेल्या संस्थांच्या विरोधात प्रसार माध्यमांना हाताशी धरून तसेच समाज माध्यमांचा वापर करून अत्यंत पद्धतशीरपणे गरळ ओकली जात आहे. आपण गांधी घराण्याचे सदस्य आहोत म्हणजे आपण संविधानापेक्षा श्रेष्ठ आहोत, असा राहुल गांधींचा समज आहे. त्यामुळे लोकसभा सभागृह चालविण्यासाठी संविधानाने तयार केलेले नियम, कायदे पाळण्याची त्यांची तयारी नाही. हे नियम, कायदे पाळून राहुल गांधींना अनेक विषयावर भरपूर वेळ बोलता येईल. पण आपल्याकडे अर्थसंकल्पासारख्या विषयांवर अभ्यास करून बोलण्यासाठी मुद्दे नाहीत हे राहुल गांधींना ठाऊक असल्याने वेगवेगळ्या मार्गांचा वापर करून ते मूळ विषय सोडून भलत्याच मुद्द्यावर बोलणे सुरू करतात. अशा प्रसंगात अध्यक्ष नियमांचा आधार घेऊन त्यांना बोलण्यास प्रतिबंध करतात. ओम बिर्ला हे लोकसभेचे पहिले अध्यक्ष आहेत ज्यांनी नैतिकतेच्या आधारावर अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू झाल्यापासून अध्यक्षपद भूषवले नाही. विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावाच्या चुकीच्या नोटिसाही दुरुस्त करून स्वीकारल्या. त्यांच्या कार्यकाळात लोकसभेची उत्पादकता ९१ टक्के राहिली आहे. शून्यकालाची वेळ पाच तासांपर्यंत वाढवण्यात आली आणि अनेकदा रात्री १२ वाजेपर्यंत सदस्यांना प्रश्न मांडण्याची संधी दिली. सभागृह सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील परस्पर विश्वासावर चालते आणि सभागृहाचे अध्यक्ष हे सत्ताधारी व विरोधी पक्ष या दोघांसाठीही सभागृहाचे संरक्षक असतात. लोकसभा कशी चालवायची यासाठी लोकसभेने काही नियम निश्चित केले आहेत. संसद म्हणजे एखादी जत्रा, जाहीर सभा नाही; त्यामुळे सभागृहाचे प्रमुख नियमानुसार परवानगी देत नसतील तर कोणालाही नियम मोडून बोलण्याचा अधिकार नाही. लोकसभेच्या नियमांकडे दुर्लक्ष झाले तर ते थांबवणे आणि योग्य मार्गदर्शन करणे हे लोकसभा अध्यक्षांचे कर्तव्य आहे. हे नियम देशाच्या पहिल्या संसदेपासून, देशाच्या पहिल्या पंतप्रधानांच्या काळापासून लागू आहेत; मात्र प्रमुख विरोधी पक्षाने अनेकदा या नियमांचे उल्लंघन केले आहे. लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयावर किंवा त्यांच्या निष्ठेवर शंका घेणे अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय आहे. काँग्रेस आणि राहुल गांधी आणीबाणीच्या काळातील विशेषाधिकाराच्या मानसिकतेत अजूनही वावरत आहेत, म्हणून जनता त्यांना सतत नाकारत आहे. लोकसभा अध्यक्षांवरील अविश्वास ठरावावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्यांनी सुमारे १३ तास चर्चा केली. ४२ हून अधिक खासदारांनी त्यात सहभाग घेतला. आजपर्यंत लोकसभा अध्यक्षांचा निर्णय अंतिम मानण्याची परंपरा होती; परंतु विरोधकांनी लोकसभा अध्यक्षांच्या निष्ठेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लोकसभा ही भारताच्या लोकशाहीची सर्वात मोठी पंचायत आहे आणि भारतासह संपूर्ण जगात आपल्या लोकशाहीची प्रतिष्ठा आहे. अशा या संस्थेच्या प्रमुखाच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित झाले, तर केवळ देशातच नव्हे तर जगभरात भारताच्या लोकशाही प्रक्रियेवर प्रश्न निर्माण होतात. १९५४ मध्ये ग. वा. मावळंकर यांच्याविरुद्ध सोशलिस्ट पक्षाने अविश्वास प्रस्ताव आणला होता. १९६६ मध्ये तत्कालीन लोकसभाध्यक्ष सरदार हुकूम सिंग यांच्याविरुद्ध संयुक्त सोशलिस्ट पक्षाने प्रस्ताव आणला होता. तसेच १९८७ मध्ये बलराम जाखड यांच्याविरुद्ध कम्युनिस्ट पार्टीने अविश्वास प्रस्ताव आणला होता. या सर्व पक्षांचा आजच्या विरोधी आघाडीत काही ना काही प्रमाणात समावेश आहे. भारतीय जनसंघाने किंवा त्यानंतर भारतीय जनता पक्षाने किंवा भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीने कधीही असा प्रस्ताव मांडला नाही. भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीने लोकसभेत रचनात्मक विरोधक म्हणून काम केले आणि लोकसभा अध्यक्षपदाच्या प्रतिष्ठेचे रक्षण केले. भाजपने आपल्या कायदेशीर अधिकारांच्या संरक्षणाची मागणी केली; परंतु लोकसभा अध्यक्षांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव कधीही आणला नाही. जेव्हा सध्याचा मुख्य विरोधी पक्ष म्हणजे काँग्रेस सत्तेत होता, तेव्हाही तीन वेळा अध्यक्षांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आले होते. त्यावेळी अशी परंपरा होती की, अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू असताना लोकसभा अध्यक्ष आसनावर बसत नाहीत; मात्र त्या तीनही वेळा काँग्रेसचे लोकसभा अध्यक्ष आसनावर विराजमान झाले होते. मात्र बिर्ला यांनी नैतिकतेच्या कारणावरून अविश्वास ठरावावर चर्चा पूर्ण होईपर्यंत आसनावर बसणे टाळले. राहुल गांधींच्या आततायी वर्तनामागे काँग्रेस फरफटत चालली आहे. या चर्चेतून काँग्रेसचे ढोंग उघडे पडले. त्यातून काँग्रेसचे नेतृत्व काही धडा शिकते का हे पाहू या.

## इदगाह-नाळवंडी नाका रस्त्यावर गतीरोधक बसवा-मायाताई मिसळे

बीड दि १७ (प्रतिनिधी)- शहरातील पेठ बीड भागातील नागोबा गल्ली,इदगाह ते नाळवंडी नाका चौक या रस्त्यावर गतीरोधक नसल्याने वाहनधारकांकडून भरधाव वेगाने वाहने चालवली जात असून अपघातांची मालिका वाढत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या रस्त्यावर शाळा, महाविद्यालये, देवस्थान तसेच पेठ बीड पोलीस ठाणे असल्याने दिवसभर मोठ्या प्रमाणात रहदारी असते.गेल्या काही वर्षांत या रस्त्याचे काम करण्यात आले असले तरी कामादरम्यान गतीरोधक बसवण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी चारचाकी, रिक्षा व दुचाकी वाहने अतिवेगाने धावत असून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. काही अपघात घडल्याचीही नोंद आहे. रस्त्यालगतच्या वस्तीत राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले



असून, पादचारी-विशेषतः शाळकरी मुले, विद्यार्थिनी व ज्येष्ठ नागरिक-यांना जीव मुठीत घेऊन रस्ता पार करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी वाहनांचा वेग अधिकच वाढत असल्याने परिस्थिती आणखी धोकादायक बनते. या पार्श्वभूमीवर आरपीआय (ए)च्या महिला जिल्हाध्यक्षा सौ. मायाताई मिसळे यांनी या मार्गावर किमान चार ते पाच गतीरोधक तातडीने बसवावेत, अशी मागणी केली आहे.

## कुणबीमधून नितीन साळुंखे यांची साळुंखवाडी पोलीस पाटीलपदी वर्णी



घाटनांदूर दि १७( प्रतिनिधी) - पोलीस पाटील पदाच्या निवडीमध्ये मराठा समाजातील उमेदवारांनी कुणबी ओबीसी प्रमाणपत्राचा वापर करत गावच्या पोलीस पाटील पदी निवड मिळवली आहे. घाटनांदुर येथून जवळ असलेल्या साळुंकवाडी येथील मराठा समाजाचे नितीन सोळंके यांची गावच्या पोलीस पाटील पदी कुणबी ओबीसी प्रमाणपत्रावर निवड झाली आहे. त्या अनुषंगाने आज साळुंकवाडी येथिल मराठा समाजाच्या वतीने संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांची अंतरवली येथे भेट घेऊन आभार व्यक्त केले. संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या 'इफ्फेट' मुळे ही निवड झाल्याचे नवनिर्वाचित पोलीस पाटील नितीन साळुंखे यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सौदागर भैय्या जगदाळे, शिवराज साळुंखे,व्यंकटि पटाडे,दिपक साळुंखे, सिध्दनाथ साळुंखे, शरद साळुंखे, आदि उपस्थित होते.

## गावसंस्कृतीचा दस्ताऐवज 'शिरगुळा' देवीदास फुलारी यांचे प्रतिपादन

माजलगाव दि १७(प्रतिनिधी) - प्रभाकर साळेगावकर यांचा शिरगुळा हा ललितलेख संग्रह म्हणजे गावगाड्यातील विविध प्रवृत्तीच्या माणसाचे हे व्यक्तिचित्रण होय. खरे म्हणजे अंशतः का होईना लेखकाचे हे आत्मकथन होय. मागील तीन तपाची सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्पंदने यात समाविष्ट आहेत. मायबोलीचे वेगवेगळे नवीन शब्द साळेगावकर यांनी यात समाविष्ट केलेले आहेत. एकूणच शिरगुळा म्हणजे केवळ साळेगावच नव्हे तर एकुणच गाव संस्कृती चा दस्तऐवज आहे असे प्रतिप्रादन साहित्यिक देवीदास फुलारी यांनी केले ..काल ते साळेगाव ( कोथरूळ ) येथील हनुमान मंदिरात कवी प्रभाकर साळेगावकर यांच्या ललित लेख संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. यावेळी अध्यक्ष कवी नारायण सुमंत , तर राजेसाहेब



कदम , जीवन नखाते , दिपक कदम , प्रशांत राठोड , अतुल कुलकर्णी , सौ. माधुरी साळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रतिमापूजन झाले, सखाराम जोशी यांनी मराठवाडा गीत सादर करून वातावरण मंगलमय केले. आसावरी प्रकाशनाच्या वतीने प्रास्ताविक अतुल कुलकर्णी यांनी केले. जीवन नखाते , राजेसाहेब कदम , लेखक प्रभाकर साळेगावकर ,गोविंद कदम यांची समयोचित लक्षवेधी मनोगते झाली.अध्यक्षीय समारोप करताना कविवर्य नारायण सुमंत म्हणाले गावाच्या मातीची हृद्य स्पंदनाचा हा शिरगुळा म्हणजे भाषिक संक्रमणाचा दिशा दर्शी खुंट कंदील आहे. आठवणीने गाव उजळून टाकण्याचे कसब प्रभाकर साळेगावकर यांच्या लेखनीला आहे. काल टिकवून ठेवण्याची, भाषा समृद्धी ची , माणसं जोडण्याची सुंदर रांगोळी म्हणजे शिरगुळा आहे. सुत्रसंचालन गझलकार दिवाकर जोशी यांनी केले तर आभार दिपक कदम यांनी मानले. या सोहळ्यास अंगद कदम , र. ब. देशमुख , भास्कर चोपडे , बी. एस. देशपांडे ,ॲड.आर. डी. भिलेगावकर , बळीराम वायबसे , परमेश्वर कदम , पुष्कर कदम , बापू दासरी , भारत सोळंके , कैलास सोळंके , प्रशांत भानप , प्रा. लडड्डा , प्रा. रमेश गटकळ , दगडुबप्पा कदम , प्रमोद कुलकर्णी ,बालाप्रसाद चव्हाण ,अनिल चवळे , रोटेरीयन दिगंबर महाजन , सुरेश भानप , अनिलकुमार होळकर , एकनाथ जाधव , प्राणेश पोरे , संतोष मुळी , विजयकुमार ठोसर , सुधीर देशमुख , ओम दायमा , कुमार कुलकर्णी , बापु गवळी , मोहन राठोड. ,सचिन कुलकर्णी , स्वाती जोशी , अश्विनी ब्रम्हगावकर , त्रिंबक कदम ,बाबुराव गुरव ,रंगनाथ सावंत , प्रशांत खुर्पे यांच्या सह गावकरी व साळेगावकर स्नेही यांनी गर्दी केली होती.चि. राम प्रल्हाद कदम याने गायिलेल्या पसायदानाचे प्रकाशन सोहळ्याची सांगता झाली.

## योगेश कुंभारकर यांचा वाढदिवस बेघराबरोबर बेघर निवारा केंद्रात साजरा

बीड दि १७(प्रतिनिधी)- येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश कुंभारकर यांनी हारतुरे व केक ना कापता अनाथ लोकांसोबत वाढदिवस साजरी केला.सामाजिक कार्यकर्ते योगेश कुंभारकर यांनी हारतुरे व केक ना कापता अनाथ लोकांसोबत वाढदिवस साजरी केला. बीड शहरातील योगेश कुंभारकर हे आपल्या सामाजिक कार्यामुळे एक ओळख आहे समाजाचा कोणताही प्रश्न असेल तर ते पुढाकार घेऊन प्रश्न उचलतात तसेच त्यांचा १६ मार्च रोजी वाढदिवस होता त्यानिमित्ताने बीड शहरामध्ये शहरी बेघर निवारा केंद्र येथे अनाथ लोकांसोबत फळ वाटप करून मोठ्या उत्साहाने योगेश कुंभारकर यांनी वाढदिवस साजरी केला आहे काल त्यांच्या वाढदिवसानिमित्त राजकीय व सामाजिक आणि शैक्षणिक, व्यापार क्षेत्रातील व विविध क्षेत्रातील त्यांनी सामाजिक उपक्रम राबवून जो वाढदिवस साजरा केला आहे त्यानिमित्ताने त्यांच्यावर विविध क्षेत्रातील लोकांनी शुभेच्छाचा वर्षाव केला. बीड शहरातील योगेश कुंभारकर हे आपल्या सामाजिक कार्यामुळे एक ओळख आहे समाजाचा कोणताही प्रश्न असेल तर ते पुढाकार घेऊन प्रश्न उचलतात तसेच त्यांचा १६ मार्च रोजी वाढदिवस होता त्यानिमित्ताने बीड शहरामध्ये शहरी बेघर निवारा केंद्र येथे अनाथ लोकांसोबत फळ वाटप करून मोठ्या उत्साहाने योगेश कुंभारकर यांनी वाढदिवस साजरी केला आहे काल त्यांच्या वाढदिवसानिमित्त राजकीय व सामाजिक आणि शैक्षणिक, व्यापार क्षेत्रातील व विविध क्षेत्रातील त्यांनी सामाजिक उपक्रम राबवून जो वाढदिवस साजरा केला आहे त्यानिमित्ताने त्यांच्यावर विविध क्षेत्रातील लोकांनी शुभेच्छाचा वर्षाव केला.

## बीडमध्ये 'कुबेर का खजाना' परिसंवादाचे आयोजन

बीड दि १७ (प्रतिनिधी)- नारायण रेकी सत्संग परिवार, बीड यांच्या वतीने नारिरत्न आग्रशिरोमणी व जागतिक विक्रमादित्य जीवन परिवर्तन वक्ता श्रीमती राजेश्वरजी मोदी (राज दीदी) यांच्या मार्गदर्शनाखाली 'कुबेर का खजाना' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात राज दीदी त्यांच्या सुमधूर वाणीतून सकारात्मक विचार, आध्यात्मिक उन्नती तसेच जीवनात समृद्धी कशी साध्य करावी यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. हा परिसंवाद सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.शहरातील एम.आय.डी.सी.भागातील मॉ वैष्णो पॅलेस,या ठिकाणी हा विशेष परिसंवाद कार्यक्रम संपन्न होणार आहे. सदर परिसंवादासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात आले असून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी व यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी सौ. सारिका अग्रवाल, सौ. शांता गिल्डा, सौ.सविता सारडा, सौ. मधु कोटेचा, सौ.सुनीता सारडा, सौ.अर्चना मुंदडा, सौ.अनुश्री लड्डा व सौ.अनुराधा लड्डा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यासह शहर व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रेरणादायी परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजन एन.आर.एस.पी. परिवार, बीड यांनी केले आहे.

## गणपतीपुळे येथे अल्ट्रा मॅरेथॉन मध्ये शरद खिल्लारे अव्वल तर राहुल पवार द्वितीय ;५६ किमी स्पर्धेत बीडच्या धावपटूंची कामगिरी

बीड दि.१७(प्रतिनिधी) - गणपतीपुळे अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये बीडच्या धावपटूंनी झंझावाती कामगिरी करत बाजी मारली. ५६ किलोमीटरच्या आव्हानात्मक स्पर्धेत शरद खिल्लारे यांनी अव्वल स्थान पटकावत सर्वांचे लक्ष वेधले, तर राहुल पवार यांनी द्वितीय क्रमांक मिळवत बीडच्या क्रीडा परंपरेला साजेशी कामगिरी केली.

सुवर्णसूर्य फाउंडेशनतर्फे आयोजित गणपतीपुळे अल्ट्रा मॅरेथॉन - दुसरे पर्व शनिवारी दि.१४ रोजी अतिशय उत्साही वातावरणात पार पडले. यामध्ये ५६ किलोमीटरच्या स्पर्धेत पुरुष गटात बीड येथील शरद खिल्लारे यांनी ५ तास १९ मिनिटांत अंतर पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळविला. राहुल पवार यांनी ५ तास ४२ मिनिटांत शर्यत पूर्ण करून द्वितीय क्रमांक पटकावला. तर डॉ.अमोल मोराळे यांनी ६ तास ५० मिनिटांत शर्यत पूर्ण केली.या अल्ट्रा मॅरेथॉनचे उद्धाटन शनिवारी मध्यरात्री श्री क्षेत्र गणपती पुळे देवस्थानाच्या आवारात पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आले. विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.राज्यभरातून सुमारे २०० धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. बीडच्या धावपटूंनी यापूर्वीही



विविध मॅरेथॉन स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपली ओळख निर्माण केली असून, या यशाने त्यांच्या कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

## विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळवलेल्या प्रद्युम्न घुलेचा सत्कार



बीड दि १७ (प्रतिनिधी)- ज्येष्ठ शिक्षक नेते स्व.द.बा घुमरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व व विज्ञान प्रदर्शन स्पर्धा २०२६ प्रदर्शनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा विद्यार्थी घुले प्रद्युम्न याने जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल त्याचे आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सदर सत्कार अध्यक्ष धुतालमल, सचिव ड. व्ही बी. मगर सर्व संचालक आणि या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी .ए .हावळे यांनी करून अभिनंदन केले असून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. चि. प्रद्युम्न श्रीहरी घुले या विद्यार्थ्यास सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि २१०० रू पारितोषिक प्राप्त झाले आहे. या विद्यार्थ्याचे मार्गदर्शक विज्ञान शिक्षिका श्रीमती. एन .जी. मुंडे आणि श्री. डब्ल्यू .एस .वाघमारे यांनी अमूल्य मार्गदर्शन केले होते. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आनंद छात्रालयाचे अधिक्षक श्री. डी .व्ही. खरसाडे, समर्थ गुरुकुल चे अधिक्षक श्री. रविराज घुले, विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद सर्व शिक्षक इतर कर्मचारी व पालक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ज्योती विजयकुमार गिरे पुरस्काराने सन्मानित

बीड दि १७ (प्रतिनिधी) -सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ दिला जाणारा प्रतिष्ठेचा पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्कार यशोदीप गुरुकुलच्या संचालिका ज्योती विजयकुमार गिरे यांना प्रदान करण्यात आला. बीड तालुक्यातील पसायदान सेवा प्रकल्प, ढेकणमोहा व श्री शक्ती प्रतिष्ठान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा दरवर्षी सन्मान करण्याची ही परंपरा असून, यावर्षी शिक्षण व



समाजकार्य क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्दल ज्योती गिरे यांची निवड करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसंग्राम नेत्या सौ. ज्योतीताई विनायकराव मेटे या होत्या. त्यांच्या हस्ते तसेच सरपंच मंजुषा गाडीवान, माजी नगरसेविका जयश्रीताई विधाते, पसायदान सेवा प्रकल्पाच्या संचालिका रंजना गोवर्धन दराडे, प्रियंका तोष्णीवाल आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ज्योती गिरे यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे इफ्तार पार्टीचा स्तुत्य उपक्रम

पाटोदा दि.१७ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने रमजाननिमित मुस्लिम बांधवांच्या रोजादारास इफ्तार पार्टीचे आयोजन करून दलित हिंदू-मुस्लिम बांधव एकता दर्शन घडवून आणले.पवित्र रमजान महिन्यानिमित्त पाटोदा शहरात सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने सोमवार दि. १६ मार्च रोजी दर्गावाली मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून पाटोदा शहरातील सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला.



इफ्तार कार्यक्रमाला विविध धर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हिंदू-मुस्लिम बांधव एकत्रितपणे बसून रोजा सोडत असल्याचे दृश्य अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी ठरले. यावेळी उपस्थितांनी एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा देत समाजात शांतता, परस्पर आदर आणि बंधुभाव कायम ठेवण्याचा संदेश दिला.यावेळी बोलताना समितीचे अध्यक्ष सुरज जावळे व पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना अनुसरून हा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. विविध धर्मीय समाजातील लोकांनी एकत्र येऊन सण साजरे केल्याने समाजात एकात्मतेची भावना अधिक दृढ होते, असेही त्यांनी नमूद केले.याप्रसंगी नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव, डॉ. नरेंद्र जावळे, प्रकाश जावळे, शेतकरी नेते गणेश कवडे, ॲड. सय्यद वहाब,जेष्ठ श,मराठा सेवक बाबा तिपटे,चेतन जावळे, पत्रकार मंडळी यांच्यासह अनेक मान्यवर व भिम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दादर रेल्वे स्थानकाचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी करा लोकजनशक्ती पार्टी (रामविलास)चे अंबाजोगाईत धरणे आंदोलन

अंबाजोगाई दि १७ (प्रतिनिधी )- दादर रेल्वे स्थानकाचे नांव बदलून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी करण्यात यावे या मागणीसाठी लोकजनशक्ती पार्टी (रामविलास) चे युवा मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे यांच्या नेतृत्वात मंगळवारी अंबाजोगाईतील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.या विषयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हाधिकारी, बीड यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लोकजनशक्ती पार्टी (रामविलास) चे राष्ट्रीय नेते तथा केंद्रीय मंत्री चिरागजी पासवान यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या लोकजनशक्ती पार्टी महाराष्ट्राच्या वतीने १७ मार्च २०२६ पासून महाराष्ट्रभर आपल्या सर्वांचेच आदरणीय भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार राज्यघटनाकार बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दादर रेल्वे स्टेशनला चैत्यभूमी नांव देण्यात यावे. अशा प्रकारची मागणी घेऊन महाराष्ट्रभर लोकजनशक्ती पक्षाच्या वतीने जन आंदोलन करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवार, दिनांक १७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले.सदरील धरणे आंदोलनात लोकजनशक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, नाना सरवदे, लखन कांबळे, अभिषेख तरकसे, महेंद्र शेवाळे, करण तेलंग, अझर सय्यद, आदित्य चौरे, भैय्या केरकर, किरण घुमरे, विशाल शेवाळे, दयानंद कांबळे, अजहर, शेख फेरोज, कैलास मस्के यांच्यासह आंबेडकर प्रेमी नागरिक व सामाजिक संघटना सहभागी झाल्या होत्या. माजी आ.पृथ्वीराज साठे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे



कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमशक्तीचे जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष असेफोद्दीन बाबा खतीब, रिपाइंचे दीपक कांबळे, तानबा लांडगे, युवा आंदोलनचे अशोक पालके, जीवनराव घाडगे, सुधाकर जोगदंड, वसंतराव उदार आदींसह मान्यवरांनी भेट दिली.

# आई नवसाई देवी मंदिराचा भूमिपूजन सोहळा व कीर्तन महोत्सव उत्साहात

बीड (प्रतिनिधी) : श्रीक्षेत्र जरूड (ता. जि. बीड) येथे आई नवसाई देवी मंदिराच्या भव्य बांधकामाचा शुभारंभ भूमिपूजन सोहळ्याने करण्यात येणार असून, या पवित्र सोहळ्याचे आयोजन अत्यंत भक्तिभावाने करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार असून संत-महंतांच्या आशीर्वादाने व मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार आहे.

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ६ वाजता सर्व भाविकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत पंचक्रोशीतील विविध भजनी मंडळांकडून सुरेल भजनांचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. सकाळी ११ वाजता हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सोहळ्याला मराठा संघर्षयोद्धा मा. श्री. मनोजदादा जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. संत-महंतांच्या आशीर्वादामुळे या सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त होणार आहे. कीर्तनासाठी ह.भ.प. रामायणाचार्य गणेश महाराज लोंढे (माऊलीदादा वारकरी शिक्षण संस्था, भेंडटाकळी) यांचे प्रभावी कीर्तन होणार असून, त्यांच्या वाणीतील आध्यात्मिक संदेशातून भाविकांना भक्तिरसाचा अनुभव घेता येणार आहे.ह. भ. प. नवसाई कृपांकित युवकीर्तनकार माऊली महाराज जरूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सोहळा पार पडणार असून, त्यांच्या प्रेरणेमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक अधिष्ठान लाभणार आहे.या कार्यक्रमासाठी गावातील तसेच परिसरातील सेवाभावी व्यक्तींनी उत्स्फूर्त सहकार्य केले आहे. भंडारा, पाणी व्यवस्था, कीर्तन सोहळा तसेच इतर नियोजनात ग्रामस्थांचा मोठा सहभाग राहिला आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त जरूड ग्रामस्थांनी व्यापक तयारी केली असून, सर्व भाविकांनी या पवित्र सोहळ्यास उपस्थित राहून भूमिपूजन, कीर्तन महोत्सव व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माटेगाव येथे महाराजस्व समाधान अभियान शिबीर संपन्न



गेवराई दि.१७ (प्रतिनिधी) : राज्य शासनाच्या निर्देशानुसार मार्च ते मे २०२६ या कालावधीत गेवराई तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत असून माटेगाव येथील हनुमान मंदिराच्या प्रांगणात दि.१४ मार्च रोजी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा या उद्देशाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तहसीलदार संदीप खोमणे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून कट्टे साहेब (नायब तहसिलदार), मा.कुटे मॅडम (नायब तहसिलदार गेवराई), श्री मोरे साहेब (नायब तहसिलदार गेवराई) हे उपस्थित होते. माटेगाव मंडळाचे मंडळ अधिकारी मोराळे व मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच तलवाडा मंडळाचे मंडळ अधिकारी बाबा बडे, महसूल व इतर प्रशासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि माटेगाव चे सरपंच माऊली अरबड, देवपिंपरी, भोजगाव, ब्रह्मगाव, खळेगाव, शेकटा, राजपिंपरी येथील सरपंच-उपसरपंच, सदस्य, गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अभय गोंडीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थित होते. या शिबीरामध्ये माटेगाव मंडळातील सर्व गावातील नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.या शिबीरामध्ये परिसरातील नागरिक, शेतकरी व युवकांनी सहभाग नोंदविला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा प्रकारचे शिबिरे अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तहसील कार्यालय गेवराई, महसूल मंडळ अधिकारी कार्यालय माटेगाव तसेच संबंधित विभागांनी विशेष परिश्रम घेतले.

# धाराशिव मध्ये गौरव झालेल्या डॉ.श्रद्धा एडकेचा आदित्य शिक्षण संस्थेनेकडून सत्कार करून गौरव

बीड दि १७ (प्रतिनिधी)- आदित्य शिक्षण संस्था, कृषीची माआजी विद्यार्थिनी डॉ श्रद्धा एडके हिला धाराशिव येथे तेजस्विनी कन्या या प्रतिष्ठित सन्मानाने जागतिक महिला दिनानिमित्त गौरविण्यात आले. धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.



डॉ. श्रद्धा एडके यांनी आदित्य कृषी शाख, बीड येथे सन २०१३ ते २०१७ या कालावधीत बी.एस्सी. ॲग्रिकल्चर पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली येथून पीएच.डी. पूर्ण केली. त्यांनी उद्यानविद्याशास्त्र विभागात भाजीपाला शास्त्र (व्हेजिटेबल सायन्स) या विषयात संशोधन केले. पीएच.डी.मधील त्यांचे संशोधन कार्य उल्लेखनीय आहे. कोकण कृषी-हवामानिक परिस्थितीत पोल प्रकार डोलिचोस बीन्स यांचे संकलन व मूल्यांकन आणि आण्विक मार्कर्सद्वारे त्यांचा विविधता विश्लेषण या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांनी वेलवर्गीय घेवडा या पिकाचा डी एन ए -आधारित जनुकीय अभ्यास केला. या कार्यामुळे त्यांनी कोकण कृषी विद्यापीठात नावलौकिक मिळवला. कृषी क्षेत्रातील विविध विषयांवर त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांनी संशोधनात्मक कार्यही केले. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ, उत्पन्नवाढ याबाबत प्रभावी मदत केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसह आर्थिक लाभ झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांना तेजस्विनी कन्या या सन्मानाने गौरविण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल आदित्य कृषी शाखा, बीड येथेही डॉ. श्रद्धा एडके यांचा सत्कार करण्यात आला. आदित्य शिक्षण संस्था, बीडच्या सन्माननीय संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते हा सत्कार झाला.

## लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी पटकावले अकरा सुवर्ण पदके

पाटोदा (प्रतिनिधी) : येथील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या आकारा विद्यार्थ्यांनी मॅथ्स ऑलिम्पियाड दिल्ली येथील अकॅडमी ची गणित विषयाची स्पर्धा परीक्षा मध्ये आकारा मुलांना गोल्ड मेडल्स मिळाले आहेत. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुलांचा सत्काराचा कार्यक्रम शाळेचे प्राचार्य पठाण सर यांनी आयोजित करून, मुलांना प्रमुख पाहुणे मा. पोलिस निरीक्षक बन्सी आण्णासाहेब जायभाय , प्रसिद्ध उद्योजक श्री अच्युतराव चौरे, सामाजिक कार्यकर्ते वसंत चौरे यांच्या हस्ते मेडल्स, प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ऑलिम्पियाड परीक्षा प्रमुख अर्जुन सानप सर, सौ. उज्वला मॅडम, आणि सौ. प्रतिक्षा अर्जुन सानप कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते अर्जुन सानप यांचाही चांगले मार्गदर्शक म्हणून सत्कार करण्यात आला.



बीड -पंजाबी समाजाचे अध्यक्ष दिपक आहुजा यांच्या मुलाच्या लग्नानीमीत्त गुरुनानक देवाची फोटो देऊन सत्कार करताना डॉ. जेसवाणी (अध्यक्ष सिंधी समाज) व दिपक मोटवाणी, हरीओम भुप्पड, केवल जग्गी, हर्ष जेसवाणी, भावेश जेसवाणी.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान पेंडगाव येथे उत्साहात संपन्न

## लोकाभिमुख कामे करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे - तहसीलदार शेळके

बीड (प्रतिनिधी) : शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत पेंडगाव येथे दिनांक १७ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . पेंडगाव येथील हनुमान मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवित शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे .



कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर , उपाधीक्षक भूमिअभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , तलाठी मंडळ अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . पेंडगाव महसूल मंडळातील १४ गावांतील सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य तसेच महिला बचत गट , शेतकरी गट आणि ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . शिबिरामध्ये विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना त्वरित मार्गदर्शन केले . या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा , डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग १ ते वर्ग २ रूपांतर , ई पिक पाहणी , अॅग्रीस्टॅक नोंदणी , ई वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे , ई केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प , ई शिधापत्रिका वाटप , लक्ष्मी मुक्ती योजना लाभ, रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली . या शिबिरामुळे महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले . अनेक शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या . अधिकाऱ्यांनी त्या समस्यांवर मार्गदर्शन करून काही प्रकरणे जागेवरच निकाली काढली . त्यामुळे नागरिकांना तालुका कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासली नाही . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की , शासनामार्फत सुरू करण्यात आलेले हे अभियान नागरिकांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे . प्रशासन नागरिकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहे . कोणताही सर्वसामान्य नागरिक आपली समस्या थेट मांडू शकतो आणि त्यावर योग्य तो तोडगा काढला जाईल , असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले .

## माऊली मोटर्स इंडोफार्म ट्रॅक्टर शोरूमचे १९ मार्च रोजी भव्य उद्घाटन

बीड (प्रतिनिधी) : शेतकऱ्यांना आधुनिक व किफायतशीर शेतीसाठी अत्याधुनिक ट्रॅक्टर आणि कृषी उपकरणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने माऊली मोटर्स इंडोफार्म ट्रॅक्टर शोरूम चे भव्य उद्घाटन गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. हा सोहळा त्रिमूर्ती नगर, एसबीआय बँकेच्या पाठीमागे, मांजरसुंबा रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, तसेच सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्ते शोरूमचे उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच संत-महंतांच्या पावन उपस्थितीत धार्मिक वातावरणात हा कार्यक्रम पार पडणार आहे. माऊली मोटर्स येथे इंडोफार्म कंपनीचे मजबूत, इंधन बचत करणारे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त ट्रॅक्टर उपलब्ध होणार आहेत. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार विविध मॉडेल्स, सोबतच ट्रॅक्टरसाठी लागणारे स्पेअर पार्ट्स, सर्व्हिस सुविधा आणि आकर्षक फायनान्स पर्याय एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शोरूममध्ये ट्रॅक्टरसोबतच टायर्स व रिमोल्डिंग , हायड्रॉलिक व कृषी उपकरणे तसेच आरडी फिटनेस क्लबसारख्या सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतकरी व ग्राहकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळणार आहेत. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, आयोजकांनी पंचक्रोशीतील शेतकरी, ग्राहक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.


## जाहीरनामा

**जाहिर प्रगटन देणार :दिनकर राजाभाऊ देशमुख**, वय ६५ वर्षे,
धंदाः नौकरी रा.दत्त निवास. समता कॉलनी,
माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, शिवार मौजा लोणगाव ता. माजलगाव जि. बीड येथील जमीन गट नं.७७ एकूण क्षेत्रफळ २३ हे.५३ आर आकार ६० रु.७५ पैसे हिस्सापूर्ण पैकी ०४ हे.०१ आर जिची चतुःसिमा पुर्वेस: प्रभावती बबनराव उंदरे व रामकृष्ण कारंजकर यांची जमीन, पश्चिमेस : श्रीराम मदनलाल झंवर यांची जमीन, दक्षिणेस हनुमानदास मदनलाल लाहोटी यांची जमीन, उत्तरेस : पंढरीनाथ नानाभाऊ कोळसे यांची जमीन. या चतुःसिमेच्या आतील मिळकत रमाकांत राजाभाऊ देशमुख, दिनकर राजाभाऊ देशमुख व प्रभाकर राजाभाऊ देशमुख व धोंडुबाई राजाभाऊ देशमुख यांचे नाममात्र नावे महसुल अभिलेखात नोंदलेली आहे. परंतू सदर मिळकत ही एकत्र कुटुंबाची जमीन आहे. सदर मिळकतीमध्ये माझा कायदेशीर हिस्सा आहे. सदर मिळकती बाबत वाटणी करून विभक्त ताबा मिळणे बाबतचा मा. दिवाणी न्यायाधिश व. स्तर माजलगाव यांचे न्यायालयात स्पे.दि.दा.नं.०४/२०११ रमाकांत विरुध्द राजाभाऊ वगैरे हा चालू आहे.

सदर मिळकत वरील व्यक्तींचे नाममात्र महसुल अभिलेखात नावावर असल्याचा गैरफायदा येवून एकत्र कुटूंबास कसल्याही प्रकारची आवश्यकता नसतांना रमाकांत राजाभाऊ देशमुख व प्रभाकर राजाभाऊ देशमुख हे सदर मिळकत बेकायदेशीररित्या विक्री करत आहेत तशी त्यांची विविध लोकांशी बोलणी व ठराव देखील चालू आहे.सर्व जनतेस नम्रपुर्वक कळविण्यात येते की, त्यामुळे उपरोक्त वर्णनाच्या मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेने रमाकांत राजाभाऊ देशमुख व प्रभाकर राजाभाऊ देशमुख यांचे बरोबर खरेदी, विक्री, इसारपावती, बक्षिसपत्र, दानपत्र, वाटणीपत्र, संमतीपत्र, मृत्युपत्र, व इतर कोणत्याही प्रकारचा करार अथवा व्यवहार करू नये नसता संभाव्य होणाऱ्या खर्च व संपुर्ण परिणामांची संपुर्ण जबाबदारी करार/खरेदी करणाऱ्या व्यक्तीवर राहिल तसेच त्यास पोलीस, दिवाणी व फौजदारी कार्यवाही सामोरे जावे लागेल.

दिनांक : १७/०३/२०२६

मार्फत :
**ॲड.टी.एन.कोल्हे**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव
ऑफीस : रेणापुरी, ता. माजलगाव
जि. बीड. मो.नं. ९४२३१४३८४८

**जाहीर प्रगटन देणार**
**दिनकर राजाभाऊ देशमुख**
रा.दत्त निवास, समता कॉलनी,
माजलगाव ता. माजलगाव जि.बीड


# कांदा काढणी जोरात ; भाव घसरल्याने शेतकरी चिंतेत

## मजुरी वाढल्याने खर्चात झाली मोठी वाढ

पिंपळनेर (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सध्या उन्हाळी कांद्याची काढणी मोठ्या प्रमाणात सुरू झाली असून, शेतकरी शेतात काढणीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, बाजारात कांद्याचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कांद्याचे बाजार भाव एकीकडे पडले, तर कांदा काढण्यासाठी लागणाऱ्या मजुरांचे दर मात्र आकाशाला भिडले आहेत. एका जोडीला हजार रुपये मोजावे लागत आहेत. या ठिकाणी कांदा काढण्यासाठी मजुरांची अगदी पळवापळवी देखील पाहायला मिळत आहे.तालुक्यातील नाथापुर, जवळा,नाळवंडी , बेलवाडी, बाभुळवाडी, सांडरवन , पिंपळगाव ,ईट,घाटसावळी परिसरात सध्या कांदा काढणी सुरू झाली आहे. या भागांत मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड झाली होती. हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादन चांगले झाले आहे. मात्र, सध्या बाजारात कांद्याला प्रतिक्विंटल सुमारे ८०० ते १२०० रुपये दर मिळत असल्याने उत्पादन खर्च वसूल होणेही कठीण झाले आहे,असे शेतकरी सांगतात. मजुरी दर वाढले कांदा काढणीसाठी मजुरांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते.सध्या तालुक्यात मजुरांना दररोज सुमारे ४०० ते ५०० रुपये मजुरी द्यावी लागत असल्याचे शेतकरी सांगतात. काही ठिकाणी कामाच्या प्रमाणानुसार पोते भरणे किंवा कांदा गोळा करण्याच्या हिशेबानेही मजुरी दिली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च आणखी वाढला आहे.

कांद्याचे उत्पादन चांगले आले आहे, पण बाजारभाव खूपच कमी आहेत. खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढला आहे. या दरात कांदा विकल्यास खर्चही निघणे कठीण आहे, असे पिंपळनेर येथील शेतकरी बळीराम मेहेत्रे यांनी सांगितले. रंजेगाव येथील शेतकरी बळीराम तायड म्हणाले, कांदा काढणीसाठी मजुरांना जास्त मजुरी द्यावी लागते. त्यात वाहतूक खर्च वाढल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. कांदा काढणीचे काम कष्टाचे असल्याने मजुरी योग्य असल्याचे मजूर सांगतात. दिवसभर उन्हात काम करावे लागते. त्यामुळे मजुरी थोडी वाढली असली तरी ती कष्टाच्या मानानेच आहे, असे सांडरवन फाटा परिसरातील मजूर रामभाऊ भोसले यांनी सांगितले. भाववाढीची अपेक्षा सध्या शेतकरी कांदा काढून साठवणुकीकडे वळत असून, पुढील काही दिवसांत बाजारभाव वाढतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मात्र, दरात सुधारणा झाली नाही तर शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, अशी चिंता व्यक्त होत आहे.


**महाराष्ट्र शासन**
**नगर पंचायत पाटोदा**
**बांधकाम / स्वच्छता व आरोग्य विभाग**
**ई-निविदा सुचना क्रमांक २०२५-२०२६**

मुख्याधिकारी, नगर पंचायत पाटोदा, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम, खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार / सुबेअ / नोंदणीकृत संस्था यांच्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत.

**टिप :** वरील निविदा सुचने मध्ये ०१ **काम** समाविष्ठ असुन या निविदे प्रक्रियाची संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावर दिनांक १८/०३/२०२६ पासून उपलब्ध आहे.

संकेत स्थळ :- https://mahatenders.gov.in

मुख्याधिकारी
नगर पंचायत, पाटोदा.



**टि.सी.हरवला आहे**
**निखील गणेश रांजवण**
या नावाचा १२ वी विज्ञान उत्तीर्णचा टि.सी. बीड ते पुणे प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**संपर्क : निखील गणेश रांजवण**
**रा.बीड ता.जि.बीड.**



दै.पार्श्वभूमी,बीड Date-17/03/2026

**CHANGE IN NAME**
I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME
**OLD NAME - PADMABAI SANTOSH TAVANI**
**New Name : PADMA SANTOSH TAWANI**
PRESENT ADDRESS: W/O SANTOSH TAWANI, OPP. GANAPATI MANDIR, HO. NO. 3-15-128, BADRI VISHAL, VIPRA NAGAR, VTC: BID. DISTRICT: BID STATE: MAHARASHTRA PIN CODE: 431122

पार्श्वभूमी
दि.१८ मार्च २०२६ बुधवार पान ६

## रमाकांत चव्हाण यांचे निधन



माजलगाव (प्रतिनिधी):-तालुक्यातील एकबुर्जी येथील सामाजिक कार्यकर्ते रमाकांत धोंडीराम चव्हाण यांचे मंगळवार, दि. १७ रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ५५ वर्षे होते.त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी एकबुर्जी येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

## रुद्रप्रतापसिंह तौर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र



माजलगाव दि.१७(प्रतिनिधी): तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयाचा विद्यार्थी रुद्रप्रतापसिंह योगेश तौर याने ६४ वा रँक मिळवून नवोदय विद्यालय पात्रता परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. तो नवोदय विद्यालय गढी येथे प्रवेशासाठी पात्र ठरला आहे. ग्रामीण भागात शिक्षण घेऊन रुद्रप्रतापसिंह याने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवले पान २ वर

### डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या अथक पाठपुराव्याला ऐतिहासिक यश

# मुख्यमंत्री यांच्या दूरदृष्टीतून पुरुषोत्तमपुरीला मिळणार जागतिक झळाळी

बीड दि.१७(प्रतिनिधी):– महाराष्ट्राच्या आध्यात्मिक नकाशावरील एक दैदिप्यमान रत्न म्हणजे बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील 'श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी' होय. भगवान पुरुषोत्तमाचे भारतातील एकमेव आणि अत्यंत प्राचीन श्रद्धास्थान असलेल्या या पवित्र भूमीचा कायापालट करण्याचा ऐतिहासिक संकल्प महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. आयुष्यमान भारत–मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या अविरत पाठपुराव्याची दखल घेत, मुख्यमंत्री कार्यालयाने या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी 'ॲक्शन मोड' मध्ये येत कामाला सुरुवात केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी आढावा बैठक घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना निर्देश दिले आहेत.

पुरुषोत्तमपुरीचा इतिहास जितका प्राचीन आहे, तितकाच तो थक्क करणारा आहे. सन १३१० मध्ये देवगिरीचे राजे रामदेवराय यादव यांच्या काळात उभारलेले हे 'हेमाडपंथी' मंदिर स्थापत्यशास्त्राचा एक महान चमत्कार आहे. गोदावरीच्या काठावर वसलेल्या या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील 'पाण्यावर तरंगणाऱ्या विटा' हा आधुनिक विज्ञानालाही कोड्यात टाकणारे हे वैशिष्ट्य आजही जगभरातील पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. येत्या पान २ वर





**विकासाची प्रमुख वैशिष्ट्ये :**

**रस्ते विकास:** सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत किट्टी आडगाव ते पुरुषोत्तमपुरी आणि परिसरातील मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा (१४.९३ कोटी) निधी मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आला आहे.

**पायाभूत सुविधा:** साधारण ७.१५० किमीचे नवीन रस्ते बांधकाम, आधुनिक पूल आणि भाविकांच्या सोयीसाठी भव्य नियोजनाचा यात समावेश आहे.

**प्रशासकीय वेग:** धाराशीव सार्वजनिक बांधकाम मंडळाने या कामाला तांत्रिक मंजुरी देऊन नियोजनाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे.

## श्री युवा माहेश्वरी बीडच्या अध्यक्षपदी तापडिया तर सचिवपदी डागा यांची निवड





बीड दि १७ (प्रतिनिधी) - येथील एमआयडीसी भागात झालेल्या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये श्री युवा माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया यांची तर सचिवपदी विजय डागा यांची निवड करण्यात आली. या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघटनेचे माजी सहसचिव अमर सारडा, मावळते अध्यक्ष ऋषीकेश सोहनी, सचिव अनूप चरखा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष गोपाल लड्ड, कोषाध्यक्ष आशिष कासट, सहसचिव अजय डागा, संघटनमंत्री युवराज चरखा यांचा समावेश आहे. यावेळी संघटनेच्या वतीने आयोजीत करण्यात येणार्या रक्तदान शिबीर, सुंदरकांड, कुलदेवी प्रोजेक्ट, दांडिया यासह इतर उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस युवा माहेश्वरीचे सदस्य मयुर कासट, संतोष तोष्णीवाल, नीरज सारडा, रोशन टवाणी, राहुल लोहीया, पंकज धूत, हेमंत बियाणी, संकेत टवाणी, पंकज भुतडा, पान २ वर

# जिल्हा परिषद शिक्षकांची 'बीएलओ' नियुक्ती ग्रामीण शिक्षणावर परिणाम करणारी-डॉ.ढवळे

बीड दि.१७(प्रतिनिधी) - जिल्हाधिकारी बीड विवेक जान्सन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी पुनर्निरीक्षण ( एस आय आर) मोहिमेसाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (डी एल ओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दि.१० ते २० मार्च या कालावधीत ही मोहीम राबवली जात असून, शिक्षकांना पूर्णवेळ बीएलओ ड्युटीसाठी पाठविण्यात आले आहे.या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता तीव्र झाली असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी १ किंवा २ शिक्षकांवर संपूर्ण शाळेचा कारभार सांभाळण्याची वेळ आली आहे. परिणामी शिक्षकांवर शारीरिक व मानसिक ताण वाढत असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार पालक व शिक्षकांकडून होत आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया देताना परीक्षा कालावधी अगदी जवळ आलेला असताना शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करणे म्हणजे शैक्षणिक गुणवत्तेला हरताळ फासण्यासारखे असल्याचे नमूद केले. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील पालक लेनाजी गायकवाड यांनी सांगितले की, आधीच शिक्षकांची संख्या अपुरी आहे. त्यात बीएलओसाठी शिक्षकांना पाठवल्यामुळे एकाच वर्गात दोन वर्गांचे विद्यार्थी शिकत आहेत. पुढील महिन्यात परीक्षा असल्याने आमच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. प्रशासनाने पर्यायी उपाययोजना करावी. असे नमूद केले. तर सहशिक्षिका सुवर्णा गिते यांनी सांगितले की, शाळेत १२२ विद्यार्थी असून ४ वर्ग आहेत. त्यापैकी २ शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती झाल्यामुळे उर्वरित शिक्षकांना एकत्रित वर्ग घेऊन अध्यापन करावे लागत आहे. दरम्यान, पालक व शिक्षकांनी प्रशासनाने या पान २ वर

## शिक्षक कैलास उघडे यांना आत्महत्येस प्रवृत्त प्रकरणी दोन जणावर गुन्हा दाखल

सिरसदेवी दि १७ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील अर्धा मसला येथील रहिवासी असलेले शिक्षक कैलास बाबुराव उघडे यांनी दिनांक १४ मार्च २०२६ रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली दोन जनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर माहिती अशी कि, तालुक्यातील शिरसदेवी येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ माध्यमिक विद्यालय सिरसदेवी शाळेवर सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले कैलास बाबुराव उघडे यांनी राहत्या घरी आत्महत्या केली होती याप्रकरणी उघडे सर यांनी सुसाईड नोट लिहून ठेवली होती या नोटमध्ये शिक्षक गोरकर सर आणि श्रीराम शेळके यांचे नाव होते उघडे सर यांनी सुसाईड नोटमध्ये स्पष्ट दिले होते बोरकर आणि शेळके यांनी माझा पगार बंद केला आहे त्यामुळे मी आर्थिक अडचणीत आहे असे लिहिले होते. यामुळे आत्महत्या करण्याचा निर्णय मी घेत आहे असे सुसाईड नोटमध्ये नमूद आहे. पान २ वर

# गेवराई तालुक्यात पुरवठा विभागाची कारवाई ; १२ सिलेंडर जप्त

सिरसदेवी दि.१७(प्रतिनिधी) - जागतिक युद्ध परिस्थिती विचारात घेता घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्याआदेशान्वये जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय पथक गठीत करण्यात आलेले होते.

त्यानुसार आज गेवराई तालुक्यात बीड बायपास ते जालना बायपास परिसर व शहरातील इतर भागात अचानक तपासणी केली असता एकूण १२ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केलेले आहेत वरील कारवाई माननीय श्री. शिवकुमार स्वामी जिल्हा पुरवठा अधिकारी बीड श्री संदीप खोमणे तहसीलदार गेवराई यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली असे श्री नायब तहसीलदार गजानन मोरे यांनी सांगितले. तसेच यापुढे देखील सदर मोहीम सुरूच राहील त्यामुळे हॉटेल व्यवसायिकांना घरगुती घरगुती गॅसचा वापर न करता पर्यायी व्यवस्था शोधण्याबाबत पुरवठा विभागाने आवाहन केलेले



आहे असेही गजानन मोरे नायब तहसीलदार गेवराई यांनी कळविले.

## कचरा टाकून घाण करणारे लोकांविरोधात दंडात्मक कारवाई करावी

बीड दि १७(प्रतिनिधी) -शहरातील सहयोगनगर येथील सरकारी गोदामाच्या परिसरामध्ये नागरिक जाणीवपूर्वक कचरा टाकून घाण करीत असल्याने त्यांच्यावर पाळत ठेवून नगरपालिकेने दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी या परिसरातील रहिवासी श्याम मार्कंडे यांनी केली आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी जाणीवपूर्वक लक्ष घालावे. कचरा टाकणाऱ्या नागरिक व व्यावसायिक लोकांवर पाळत ठेवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी जेणेकरून अशा अप्रवृत्ती वृत्तीला पान २ वर



# समाधी महोत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण

### सावरगाव येथे 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'ची लगबग ;भाविकांच्या स्वागतासाठी सर्व व्यवस्था सज्ज





आष्टी (प्रतिनिधी):तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, सावरगाव येथे होणाऱ्या 'नाथ संजीवन समाधी महोत्सव २०२६' निमित्त सध्या जय्यत तयारी करण्यात आली आहे. १४ मार्च ते १९ मार्च दरम्यान पार पडणाऱ्या या भव्य धार्मिक सोहळ्यासाठी देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी एकत्र येत सर्व आवश्यक व्यवस्था पूर्ण केल्या आहेत. महोत्सवादरम्यान देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसाठी निवास, पिण्याचे पाणी, वाहतूक, आरोग्य सेवा तसेच सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर तयारी करण्यात आली आहे. मंदिर परिसराची स्वच्छता, सजावट व प्रकाशयोजना करण्यात पान २ वर

# जामखेडमध्ये वाढत्या गुंडगिरी व टवाळखोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

जामखेड दि.१७(प्रतिनिधी):- जामखेड शहरातील विविध भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून टवाळखोर आणि समाजकंटकांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगरसेवक राजेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले असून, शहरातील संवेदनशील भागांमध्ये तात्काळ पोलीस गस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे नागेश्वर मंदिर रोड आणि गुगळे प्लॉटिंग परिसर, नगरपरिषद कार्यालय, सार्वजनिक वाचनालय व नाना-नानी पार्क परिसर,



शंकर मूर्ती पाठीमागील रस्ता, लेणीवाडी आणि भुतवडा रोड तसेच विंचरणा नदीकाठचा संपूर्ण परिसर या ठिकाणी समाजकंटकांचा वावर पान २ वर

# सभापती संजय उडाण यांच्या इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### इफ्तार पार्टीतुन हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन





बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील बार्शी नाका परिसरात नगरपालिकेचे सभापती संजय उडाण यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला हिंदू, मुस्लिम तसेच इतर समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक एकात्मतेचे सुंदर दर्शन घडवले.

बार्शी नाका परिसर हा विविध धर्मीय लोक एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहणारा भाग म्हणून ओळखला जातो. येथे सण-उत्सव मोठ्या उत्साहात आणि परस्पर सलोख्याने साजरे करण्याची परंपरा आहे. संजय उडाण यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांपासून या सामाजिक सलोख्याला अधिक बळ मिळत असल्याचे नागरिकांनी सांगितले. इफ्तार पार्टीत उपस्थित नागरिकांनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेतला. विविध समाजातील लोक एकत्र येऊन सण साजरा करत असल्याने कार्यक्रमातून एकात्मतेचा ठोस संदेश गेला. यावेळी सभापती संजय उडाण यांनी उपस्थितांना रमजानच्या शुभेच्छा देत समाजात ऐक्य आणि बंधुता टिकवण्याचे पान २ वर

# फुलेपिंपळगावच्या कोरडे दाम्पत्याची शेवगा शेती ठरतेय आदर्श

**तेरा वर्षांपासुन मिळविता किफायतशीर नफा**

**शेवग्याला मिळतोय १५० ते २०० रूपये भाव**

**प्रतिवर्ष पाच लाख रूपयांचे उत्पन्न घेत केला आदर्श निर्माण**

**कृषी वार्ता –तुकाराम येवले, माजलगाव**

माजलगाव शहरापासून अवघ्या शहरापासून ५ किमी अंतरावर असलेल्या फुलेपिंपळगाव येथील प्रगतशील शेतकरी रामकिसन महादेवराव कोरडे व त्यांच्या पत्नी संजीवनीताई रामकिसन कोरडे या दाम्पत्याने पारंपरिक शेतीला फाटा देत शेवगा पिकाची निवड करून यशस्वी शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. मागील तेरा वर्षांपासून ते शेवग्याची लागवड करत असून सातत्याने किफायतशीर नफा मिळवत आहेत.

मातोश्री उद्योग समूहाच्या माध्यमातून या कोरडे दाम्पत्याने त्यांच्या ३० गुंठे जमिनीमध्ये ७०० शेवग्याची ओडिसी श्री या जातीची झाडे लावून गेल्या तेरा वर्षांपासून दरवर्षी पाच लाख रुपयांचे उत्पन्न घेऊन शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. दरवर्षी ते शेवग्याची जून महिन्यामध्ये छाटणी करतात नंतर त्याला पाणी, खत, फवारणी आठ दिवसाला ते करतात. यंदा सर्वत्र शेवग्याचे उत्पादन कमी असल्यामुळे त्यांच्या शेवग्यास दीडशे ते दोनशे रुपये किलोचा भाव यावर्षी मिळाला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शेवग्याला बाजारात सध्या १५० ते २०० रुपये प्रति किलो दर मिळत असल्याने कोरडे दाम्पत्याला चांगले उत्पन्न मिळत आहे. योग्य नियोजन, कमी खर्च आणि बाजारपेठेचा अभ्यास यामुळे त्यांनी शेवगा शेतीत आपले स्थान निर्माण केले आहे. या पिकातून ते दरवर्षी सुमारे पाच लाख रुपयांचे उत्पन्न घेत असून परिसरातील इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्याकडे शेवग्याची ओडिसी श्री या जातीची शेवग्याचे बी उपलब्ध आहे हा शेवगा त्यांनी काही वेळेस बाहेर सुद्धा पाठवला आहे. बदलत्या शेती पद्धतीतून कमी खर्चात अधिक नफा मिळविण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला आहे. कोरडे दाम्पत्याच्या पान २ वर





CMYK